सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स बनविण्याच्या व्यवसायाकरिता असलेल्या किमान वेतन समितीचा सर्वसंमत

# अहवाल

## १९८२

व्यवस्थापक, श[illegible] नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
१९८४

[किंमत—रुपये १.९०]

## अनुक्रमणिका

प्रकरण १ ले

**प्रस्तावना**


| परिच्छेद | | पृष्ठ |
|---|---|---|
| (१) | | (२) |
| १.१. | समितीची स्थापना .. .. .. .. .. | १ |
| १.२. | मूळ रचना .. .. .. .. .. .. | १ |
| १.३. | विचारार्थ विषय .. .. .. .. .. | २ |
| १.४. | मुदत मर्यादा .. .. .. .. .. | २ |
| १.५. | समितीची कार्यपद्धती .. .. .. .. .. | ३ |
| १.६. | समितीच्या बैठका .. .. .. .. .. | ४ |


प्रकरण २ रे

**इतिहास**


| | | |
|---|---|---|
| २.१. | इतिहास .. .. .. .. .. .. | ५ |
| २.२. | उद्योगाच्या विकासाचे संक्षिप्त वर्णन .. .. .. | ६ |
| २.३. | व्यवसायाची ठिकाणे .. .. .. .. .. | ६ |
| २.४. | व्यवसायाचे स्वरूप .. .. .. .. .. | ६ |
| २.५. | या उद्योगासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल .. .. | ७ |
| २.६. | बाजारपेठ .. .. .. .. .. .. | ९ |
| २.७. | उत्पादन प्रक्रिया .. .. .. .. .. | ९ |
| २.८. | विद्यमान वेतने व सेवाशर्ती .. .. .. .. | १२ |
| २.९. | तत्सम लघुउद्योगांमधील वेतने व सेवाशर्ती .. .. .. | १३ |


प्रकरण ३ रे

**समितीचे विचार**


| | | |
|---|---|---|
| ३.१. | समितीचे विचार .. .. .. .. .. | १६ |

## अनुक्रमणिका

### प्रकरण ४ थे

### शिफारशी


| परिच्छेद | | पृष्ठ |
|---|---|---|
| (१) | | (२) |
| ४.१. | वेतनविषयक कल्पना .. .. .. .. .. | १८ |
| ४.२. | कामगारांचे वर्गीकरण .. .. .. .. | १९ |
| ४.३. | वेतने ग्राहक मूल्य निर्देशांकाशी जोडणे .. .. .. | २० |
| ४.४. | क्षेत्रे (परिमंडळ) .. .. .. .. .. | २० |


### प्रकरण ५ वे

### शिफारशींचा सारांश


| | | |
|---|---|---|
| ५.१. | अनुसूची .. .. .. .. .. .. | २१ |
| ५.२. | स्पष्टीकरण .. .. .. .. .. | २३ |
| | आभार .. .. .. .. .. .. | २५ |


### जोडपत्रे


| | | |
|---|---|---|
| क–एक | हा व्यवसाय अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग एक मध्ये समाविष्ट करण्याच्या उद्देशाबाबतची नोटीस. | २६ |
| क–दोन | भाग एक मध्ये समाविष्ट केल्याचा निर्णय .. .. .. | २६ |
| क–तीन ते क–चार | समितीची नियुक्ती .. .. .. .. .. | २७ ते ३० |
| ख–एक ते ख–सहा | मुदतवाढ .. .. .. .. .. .. | ३१ ते ३७ |
| ग | प्रश्नावली .. .. .. .. .. .. | ३८ |
| घ | कारखान्यांची सूची .. .. .. .. .. | ४३ |
| घ–एक | कामगारांचे विद्यमान किमान/कमाल वेतन दर्शविणारे विवरणपत्र | ४४ |
| ङ | पाहणी अहवाल .. .. .. .. .. | ४८ |
| च | विद्यमान किमान/कमाल वेतने .. .. .. .. | ५२ |
| छ | दि बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टिकल फ्रेम्स् मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने केलेले अभिवेदन. | ५३ |

# प्रकरण १ ले

## प्रस्तावना

**१.१. समितीची स्थापना.**—किमान वेतन अधिनियम, १९४८ खालील अनुसूचीत व्यवसायांमध्ये चष्म्याच्या फ्रेम्स बनविण्याच्या व्यवसायाचा समावेश करण्याचा आपला उद्देश व्यक्त करणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने संमत केला. शासनाने शासकीय राजपत्र, भाग एक-एल मध्ये क्रमांक एमडब्ल्यूए-६२७५ (८९६)-एलएबी-७, दिनांक ३० मे १९७७ या क्रमांकाची तशा आशयाची अधिसूचना प्रसिद्ध केली. त्यानंतर, तावडतोब दुसऱ्या निर्णयाद्वारे व १ डिसेंबर १९७७ रोजीच्या विशेष राजपत्र म्हणून असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये क्रमांक एमडब्ल्यूए-६२७५-(८९६)-एलएबी-७, दिनांक १ डिसेंबर १९७७, या क्रमांकाच्या अधिसूचनेद्वारे उक्त व्यवसाय किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या अधिसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आला.

त्यानंतर महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स बनविणाऱ्या व्यवसायातील सद्य:स्थितीची चौकशी करण्यासाठी व उक्त व्यवसायातील किमान वेतन दर निश्चित करण्याच्या बाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, दिनांक १५ मार्च १९७९ द्वारे महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरा) च्या कलम ५, पोट-कलम (१), खंड (क) द्वारे एक समिती स्थापन केली.

हे तिन्ही शासन निर्णय अनुक्रमे जोडपत्र क-१, क-२ आणि क-३ म्हणून सोबत जोडलेले आहेत.

**१.२. मूळ रचना.**—उक्त समितीची मूळ रचना खालीलप्रमाणे होती :—

अध्यक्ष :

**श्री. वाय. ए. रेशमवाला,**

मेसर्स रीजन्ट ऑप्टीशिअन्स,
१२-सी, पारसी बझार स्ट्रीट,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.

| मालकांचे प्रतिनिधी | | कामगारांचे प्रतिनिधी |
|---|---|---|
| १. श्री. ए. सी. शेठ, अध्यक्ष, बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टीकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, नॅशनल इंडस्ट्रीज, कस्तुरबा रोड, मालाड, मुंबई-४०० ०६४. | .. | १. श्री. एस. बी. जोशी, प्रमुख सचिव, महाराष्ट्र श्रमिक सभा, भवानी शंकर रोड, मुंबई-४०० ०२८. (हिरामणी मार्केट, गाळा क्र. २०९, डॉ. ए. बी. रोड, लालबाग, मुंबई-४०० ०१२. |

| मालकांचे प्रतिनिधी | | कामगारांचे प्रतिनिधी |
|---|---|---|
| २. श्री. अरविंद व्ही. मेहता, प्रमुख कार्यवाह, बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टीकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन अॅन्ड दी ऑल इंडिया स्पेक्टेकल्स फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मेसर्स रॉयल ऑप्टीकल इंडस्ट्रीज, बी, नायगांव एक्स रोड, वडाळा, मुंबई-४०० ०३१. | .. | २. श्री. अनाजी देसाई, सदस्य, जनरल कौन्सिल, महाराष्ट्र श्रमिक सभा, द्वारा मॉन्टेक्स कॉर्पोरेशन, राम मंदिर रोड, गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०६२. |
| ३. श्री. व्ही. आर. शाह, मेसर्स, विरको इंडस्ट्रीज, ६६, नखोडा स्ट्रीट, मुंबई-४०० ००३. | .. | ३. श्री. शंकर बाबुराव कुर्ले, सदस्य, जनरल कौन्सिल, महाराष्ट्र श्रमिक परिषद, द्वारा पामेक्स इंडस्ट्रीज, क-१८, सिग इंडस्ट्रीयल इस्टेट, राम मंदिर रोड, गोरेगांव (प.), मुंबई-४०० ०६२. |

श्री. ए. एन. सक्सेना, सहायक कामगार आयुक्त, मुंबई, यांची, आपली स्वत:ची कर्तव्ये सांभाळून समितीचे सदस्य सचिव म्हणून मूलत: नियुक्ती करण्यात आली होती. (जोडपत्र "क-चार").

**रचनेमधील बदल.**—खातेपालट झाल्यामुळे श्री. ए. एन. सक्सेना, सहायक कामगार आयुक्त, मुंबई, यांच्या जागी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२८०-२८५९-एलएबी-७, दिनांक २५ सप्टेंबर १९८० द्वारे श्री. आर. आर. करोसिया, सहायक कामगार आयुक्त, मुंबई, यांची आपली स्वत:ची कर्तव्ये सांभाळून, समितीचे सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली. (जोडपत्र "क-चार").

**१.३. विचारार्थ विषय.**—समितीची स्थापना करणाऱ्या शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, दिनांक १५ मार्च १९७९ मध्ये खालीलप्रमाणे विचारार्थ विषय विनिर्दिष्ट करण्यात आले होते, ते असे,—

(१) चष्म्याच्या फ्रेम्स बनविणाऱ्या व्यवसायातील सद्य:स्थितीची चौकशी करणे; व

(२) उक्त व्यवसायातील किमान वेतन दर निश्चित करण्याच्या बाबतीत शासनास सल्ला देणे.

**१.४. मुदत मर्यादा.**—निर्णयाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपला अहवाल शासनाकडे सादर करण्यासाठी समितीला निदेश देण्यात आला होता.

तपशीलवार पाहणी करण्याच्या दृष्टीने ठरीव कालावधी पुरेसा नसल्यामुळे समितीने शासनाकडे आणखी मुदतवाढ मागितली व समितीने वेळोवेळी केलेल्या विनंत्यानुसार शासनाने ३१ मार्च १९८२ पर्यंत समितीस मुदतवाढ दिली.

हे सर्व शासन निर्णय जोडपत्रे ख-१, ख-२, ख-३, ख-४, ख-५ व ख-६ म्हणून सोबत जोडण्यात आलेले आहेत.

१.५. **समितीची कार्यपद्धती.**—या समितीच्या सदस्यांची पहिली बैठक मुंबई येथे, दिनांक २६ एप्रिल १९७९ रोजी भरली होती. तीमध्ये समितीच्या कार्यवाहाने सदस्यांचा परिचय करून दिला व समितीने पार पाडावयाच्या कामाची रूपरेषा सांगितली. त्यापैकी सुरुवातीचे काम म्हणजे, महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स बनविणाऱ्या सर्व उपक्रमांची नावे गोळा करणे हे होते. या आधीचे काम म्हणजे, प्रश्नावली तयार करणे व आधारसामग्री व आकडेवारी गोळा करणे हे होते. किमान वेतन अधिनियम, १९४८ खाली आधिपासूनच समाविष्ट असणाऱ्या अन्य उद्योगांमध्ये कामाला असलेल्या कामगारांसाठी किमान वेतने नव्याने निश्चित करण्याकरिता शिफारशी करण्यासाठी या अधिनियमाखाली यापूर्वी नियुक्त केलेल्या समित्यांनी तयार केलेल्या प्रश्नावलीमधील प्रकरणांवर समितीने चर्चा केली व त्या प्रकरणांचा अभ्यास केला. या चर्चांमधून समितीला बरीच माहिती मिळाली व चष्म्याच्या फ्रेम्स बनविणारे ९८ टक्केहून अधिक कारखाने हे केवळ पश्चिम किनाऱ्यावर असून मुंबईतील पश्चिम रेल्वेच्या ठिकाणी आहेत याबाबत समितीची खात्री पटली: त्यामुळे समितीने आपले जास्तीत जास्त लक्ष पश्चिम रेल्वेच्या ठिकाणांवरच केंद्रित केले.

या चर्चांमध्ये समिती अशा निर्णयाप्रत आली की, या उद्योगांमध्ये :—

(१) प्लास्टीक किंवा सेल्यूलोजपासून चष्म्याच्या फ्रेम्स बनविणारे कारखाने ; आणि
(२) धातूपासून चष्म्याच्या फ्रेम्स बनविणारे कारखाने.

असे दोन प्रकारचे कारखाने आहेत. वरीलपैकी प्रत्येक प्रकारामध्ये आणखी ४ ते ५ प्रकार आहेत, उदा. प्लॅस्टीकपासून तयार करण्यात येणाऱ्या चष्म्यांच्या फ्रेम्स या दोन प्रकारच्या म्हणजे,—(१) नायट्रेट; व (२) ॲसिटेट या प्लॅस्टिकपासून तयार करता येतात. तिसरे म्हणजे, त्या पावडरपासून तयार करण्यात येतात. या उद्योगासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल हा मुख्यत्वेकरून परदेशातून आयात करावा लागतो. धातूपासून तयार करण्यात येणाऱ्या चष्म्याच्या फ्रेम्ससाठी पितळ, जस्त, निकेल, ॲल्युमिनियम, चांदी व रोल्ड-गोल्ड/सुवर्ण मिश्रित धातू या धातुंवर थोडा मुलामा देऊन त्यांचा वापर करण्यात येतो.

ही सर्व माहिती लक्षात घेऊन समितीने एक प्रश्नावली तयार केली. त्या प्रश्नावलीचा नमुना जोडपत्र-"ग" म्हणून सोबत जोडण्यात आलेला आहे. या समितीला महाराष्ट्र राज्यामध्ये असलेल्या चष्म्यांच्या फ्रेम्स बनविण्याऱ्या कारखान्याबाबतची माहिती गोळा करून त्याचा अभ्यास करावयाचा होता आणि हे सर्व कारखाने केवळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यांमध्येच असल्यामुळे समितीने या उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांचे वेतन व काम यांच्या सद्य:स्थितीची पाहाणी करण्यासाठी तसेच, या उद्योगातील निर्मिती-प्रक्रिया, वापरण्यात येणाऱ्या कच्चा माल व यंत्र-सामग्री, त्यासाठी लागणारे कौशल्य, या कारखान्यांनी व्यापलेली जागा याबाबतची आणि अन्य सर्व संबंधित माहिती गोळा करण्यासाठी काही कारखान्यांना प्रत्यक्ष भेट देण्याचे ठरविले. या भेटींमध्ये कारखान्यांचे मालक व त्यामधील कामगार यांच्या समस्यांची समितीने कसून तपासणी केली. काही ठिकाणी त्यांनी मालक व कामगार या दोन्ही बाजूंच्या हितसंबंधित व्यक्तींच्या साक्षींची नोंद केलेली आहे.

दि बॉम्बे स्मॉल स्केल ऑप्टीकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सकट विविध मार्गांनी चष्म्यांच्या फ्रेम्स बनविणाऱ्या कारखान्यांची यादी मिळविण्यात आली. त्यांनी दिलेली यादी समितीला खात्रीलायक वाटली, या यादीमध्ये एकूण १०६ कारखान्यांची नावे होती. या सर्व कारखान्यांमध्ये मिळून एकूण फक्त १,६०० कामगार कामाला होते आणि त्यामध्ये व्यापार शाखेव्यतिरिक्त

उत्पादन शाखेतील सर्व प्रकारच्या कामगारांचा समावेश होता. या सर्व कारखान्यांकडून माहिती मिळविण्यासाठी त्या प्रत्येकाकडे ही प्रश्नावली पाठविण्यात आली होती. परंतु, त्यांच्याकडून योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. आरंभीचा प्रतिसाद उत्साहजनक नसल्यामुळे कामगार आन्वेषकांनी मालकाकडून खरीखुरी आधारसामग्री/माहिती गोळा करण्यासाठी मुंबईतील ३८ कारखान्यांना प्रत्यक्ष भेट दिली. चष्म्यांच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या ज्या कारखान्यांकडून प्रश्नावलीच्या स्वरूपात माहिती गोळा करण्यात आली त्या कारखान्यांच्या नावांची यादी जोडपत्र-"घ" मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. कामगारांच्या (वर्गवार) विद्यमान वेतनाचे विवरणपत्र जोडपत्र "घ-१" मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

१.६. **समितीच्या बैठका.**—नियतकालिक बैठकांमध्ये समितीने आपल्या कामामध्ये केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला जात असे व पुढील कार्यक्रमांची आखणी होत असे. आपल्यावर सोपवलेले काम पूर्ण करण्यासाठी समितीने एकूण २७ बैठका घेतल्या. या सर्व बैठका बृहन्मुंबई येथे खालील दिनांकास कामगार आयुक्तांच्या कार्यालयामध्ये घेण्यात आल्या :—

(१) २६-४-१९७९
(२) १३-६-१९७९
(३) २७-६-१९७९
(४) ३०-१०-१९८०
(५) १५-१-१९८०
(६) २६-११-१९८०
(७) ५-१२-१९८०
(८) १०-१२-१९८०
(९) १७-१२-१९८०
(१०) २३-१२-१९८०
(११) ३१-१२-१९८०
(१२) १६-१-१९८१
(१३) १६-२-१९८१
(१४) १२-५-१९८१
(१५) २८-५-१९८१
(१६) ९-६-१९८१
(१७) २३-६-१९८१
(१८) ६-७-१९८१
(१९) १४-७-१९८१
(२०) २१-७-१९८१
(२१) ३१-७-१९८१
(२२) ७-८-१९८१
(२३) २०-८-१९८१
(२४) ५-९-१९८१
(२५) २२-९-१९८१
(२६) २९-९-१९८१
आणि
(२७) १७-१०-१९८१

समितीने बृहन्मुंबईतील चष्म्याच्या फ्रेम्स बनविणाऱ्या सहा कारखान्यांना भेट दिली आणि या कारखान्यांमधील कामाला असलेल्या कामगारांच्या कामाची व नोकरीच्या परिस्थितीची पाहणी करून कामगारांच्या विविध वर्गांनुसार कामाचे वर्गीकरण, मूल्यमापन याबाबत व त्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाच्या दरांबाबत चौकशी केली. समितीने भेट दिलेले कारखाने पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) मेसर्स, मॉन्टेक्स कॉर्पोरेशन, गोरेगाव, मुंबई.
(२) मेसर्स, राजकमल प्लास्टिक इंडस्ट्रीज, मालाड, मुंबई.
(३) मेसर्स, मेजर डाय वर्क्स, मालाड, मुंबई.
(४) मेसर्स, महाबीर ऑप्टिकल इंडस्ट्रीज, गोरेगांव, मुंबई.
(५) मेसर्स, मेटवा ऑप्टिकल सर्व्हिस, गोरेगांव, मुंबई.
(६) मेसर्स, पामेक्स इंडस्ट्रीज, गोरेगाव, मुंबई.

चष्म्याच्या फ्रेम्स बनविणाऱ्या वरील कारखान्यांना दिलेल्या भेटींच्या पाहणीवरील अहवाल एका सदस्याने सादर केलेला असून तो जोडपत्र-ङ म्हणून सोबत जोडण्यात आलेला आहे.

# प्रकरण २ रे

## इतिहास

२.१. इतिहास.—भारतामध्ये चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणारे कारखान[redacted]ळ ३३ वर्षांपूर्वी सुरू झाले. देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये या उद्योगाची भूमिका फारच छोटी आहे. हा उद्योग अजून बाल्यावस्थेतच आहे. हा उद्योग लघुउद्योग म्हणून गणला जात असून स्थल अंदाजानुसार संबंध देशामध्ये हा लघुउद्योग करणारे केवळ ४०० ते ५०० कारखाने आहेत. विविध कारखान्यांची नेमकी ठिकाणे व त्यांचा एकंदर व्याप याबाबतची अशी आधारभूत माहिती नियमितपणे उपलब्ध होत नाही. थोडयाबहुत गोळा केलेल्या माहितीवरून खालीलप्रमाणे उत्पादन केंद्रांचा तपशील मिळतो, तो असा :—

| राज्य | कारखान्यांची संख्या |
|---|---|
| **महाराष्ट्र—** | |
| मुंबई .. .. .. .. .. | ५० |
| ठाणे जिल्हा .. .. .. .. .. | ५६ |
| शेष महाराष्ट्र .. .. .. .. .. | २ |
| | 104 |
| **गुजरात—** | |
| अहमदाबाद .. .. .. .. .. | २० |
| बडोदा .. .. .. .. .. | ३० |
| राजकोट .. .. .. .. .. | ८ |
| भावनगर .. .. .. .. .. | ५ |
| सुरत .. .. .. .. .. | ८ |
| मोरवी .. .. .. .. .. | ३ |
| शेष गुजरात .. .. .. .. .. | ३५ |
| | 105 |
| **उत्तर भारत—** | |
| दिल्ली .. .. .. .. .. | १२ |
| शेष उत्तर भारत .. .. .. .. | २० |
| **बंगाल—** | |
| कलकत्ता .. .. .. .. .. | ५ |
| **दक्षिण भारत—** | |
| मद्रास .. .. .. .. .. | २ |
| बंगलोर .. .. .. .. .. | २ |
| शेष दक्षिण भारत .. .. .. .. | १० |
| संपूर्ण देशामधील अन्य छोटे कारखाने .. .. | १६० |
| एकूण .. | ४२८ |

आता, महाराष्ट्र राज्याचा विचार करता आधी सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यात चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याचा उद्योग चालविणारे जवळ जवळ १०८ कारखाने आहेत. खालील तक्ता बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यातील या उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांची विविध आकडेवारी दर्शविते :-

तक्ता

| | | |
|---|---|---|
| (१) | १०० पेक्षा अधिक कामगार .. .. .. | १ कारखाना. |
| (२) | २५ पेक्षा अधिक व १०० पेक्षा कमी कामगार . .. | ७ कारखाने. |
| (३) | १० पेक्षा अधिक व २५ पेक्षा कमी कामगार .. .. | ३१ कारखाने. |
| (४) | १० पेक्षा कमी कामगार .. .. .. | ६७ कारखाने. |
| | एकूण .. | १०६ कारखाने. |

२.२. **उद्योगाच्या विकासाचे संक्षिप्त वर्णन.**—दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालामध्ये या उद्योगांच्या विकासास प्रारंभ झाला. सन १९४७-४८ मध्ये या उद्योगास मर्यादित स्वरुपात प्रारंभ झाला तेव्हा मुंबई व कलकत्ता यासारख्या शहरांमध्ये मेसर्स आर्ट बँगल्स, युटिलिटी आर्टिकल्स आणि कटारिया ऑप्टिकल्स यासारख्या ३-४ कारखान्यांनी चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्यास सुरुवात केली होती. आधी सांगितल्याप्रमाणे आतापर्यंत या उद्योगाने उत्पादनाची अतिशय भरभक्कम पातळी गाठलेली आहे. गेल्या ३३ वर्षात सबंध देशामध्ये ४०० ते ५०० कारखाने हा उद्योग चालवत आहेत. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणे हा उद्योग अगदी काटेकोरपणे लघु-उद्योग-क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आल्यामुळे या उद्योगातील बहुतेक कारखाने हे लघुउद्योग चालवणारेच आहेत. बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा मिळून या व्यवसायातील एकूण कामगारांची संख्या अंदाजे, १,६०० इतकी असून सबंध देशातील या व्यवसायातील कामगारांची संख्या अंदाजे ६,००० इतकी आहे. संपूर्ण देशातील या ५०० कारखान्यांपैकी केवळ १० च कारखाने चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीने व उपसाधनांनी पुरेसे सुसज्ज आहेत ; आणि त्यांपैकी फक्त एकच कारखाना बृहन्मुंबईत असून त्यामध्ये १०० पेक्षा अधिक कामगार कामाला आहेत.

२.३. **व्यवसायाची ठिकाणे.**—महाराष्ट्र राज्यामध्ये मुख्यत्वेकरून बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यांमध्ये हा व्यवसाय चालवला जातो. या उद्योगाचे जास्तीत जास्त लक्ष मुख्यत्वेकरून पश्चिम बाजूस, पश्चिम रेल्वेच्या अंधेरी ते विरार या उपनगरांच्या दरम्यान केंद्रित असून गोरेगाव, मालाड, कांदिवली व भाईंदर ही उपनगरे या उद्योगाची मुख्य केंद्रे आहेत.

२.४. **व्यवसायाचे स्वरूप.**—चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याच्या विद्यमान उद्योगामध्ये मुख्यत्वेकरून स्वयंचलित यंत्रे नसून हाताने चालवावयाची यंत्रे आहेत. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्यासाठी फारशा कौशल्याची आवश्यकता नसते. बहुतांश यंत्रसामग्री ही देशी असून अतिशय थोड्या भांडवलामध्ये ती तयार करता येते व वापरण्यास सुलभ असते. या उद्योगाचा या वाढत्या महागाईच्या काळात देखील रु. ३०,००० चे गुंतवणूक करून (कुटीर उद्योग म्हणून चालविण्यासाठी)

एक छोटासा कारखाना उभारता येतो. यामध्ये जागेसाठी केलेली भांडवली गुंतवणूक समाविष्ट नाही. या उद्योगातील उत्पादनाचे स्वरूप एकजिनसी नसते तर, ते अनेक आकार, रंग व जाडीचे असते. कामाच्या साध्या स्वरूपामुळे साठ साली अनेक नवीन कारखाने उदयास आले. मुंबई शहरातील केवळ एकच कारखाना असा आहे की, जेथे १०० पेक्षा अधिक कामगार कामाला आहेत व जो अद्ययावत् परदेशी यंत्रसामग्रीने सुसज्ज असून त्याचे उत्पादन आंतरराष्ट्रीय दर्जाचे आहे. बहुतेक कारखाने हे लघुउद्योग करणाऱ्यांपैकीच आहेत. अनेक ठिकाणी एकेक मालक आपल्या स्वत:च्या घरामध्येच कुटुंबातील व्यक्तींच्या सहाय्याने हा उद्योग चालवत असल्याचे आढळून येते.

२.५. या उद्योगासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल.—या उद्योगासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल खालीलप्रमाणे आहे :—

(क) सेल्युलोज नायट्रेट शीटस् व ॲसिटेट शीटस् ;

(ख) इंजेक्शन मोल्डिंग प्रक्रिया केलेले सेल्युलोज ॲसिटेट फ्लेक्स

(ग) टोकाला क्रोमिअम, सोने यांचा मुलामा दिलेल्या किंवा ऑक्सिडाईज्ड केलेल्या निकेल धातूच्या किंवा चांदीच्या तारा ;

(घ) आयात केलेले सोन्याचे रोल्स ;

(ङ) प्लास्टिक तसेच, धातूपासून तयार केलेल्या मिश्र व संयुक्त चष्म्याच्या फ्रेम्स.

फार थोडे कारखाने परदेशातून नायट्रेट व ॲसिटेट शीटस् आयात करून त्यापासून चष्म्याच्या फ्रेम्स तयार करतात. हा कच्चा माल परदेशातून आयात करावा लागतो. प्लॅस्टिक पावडर भारतीय बाजारपेठेत सहजगत्या उपलब्ध असल्यामुळे तिला या उद्योगात लागणाऱ्या कच्च्या मालाच्या संदर्भात अधिक प्राधान्य मिळते. या उद्योगातील ८० टक्केहून अधिक कारखाने स्वतंत्रपणे निर्मिती प्रक्रिया करत असून मुख्यत्वेकरून ती या सेल्युलोज ॲसिटेट मोल्डिंग पावडरच्या सहाय्याने करत आहेत. ही सामग्री देशात पुरेशी उपलब्ध असल्यामुळे या प्रक्रियेनुसार फ्रेम्स तयार करणाऱ्या कारखान्याचा कच्च्या मालासाठी परदेशी शीटस्‌वर अवलंबून असलेल्या चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या कारखान्यांपेक्षा वेगाने विकास होत आहे. सेल्युलोज ॲसिटेट शीट्स व सेल्युलोज नायट्रेट शीटस्‌द्वारे निर्मिती प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांना या परदेशी कच्च्या मालाच्या बाबतीत काही समस्यांना तोंड द्यावे लागते. उक्त कच्च्या मालावर मालकांना फार मोठे आयात शुल्क भरावे लागते. त्यातल्या त्यात त्यांना दिलासा देणारी गोष्ट म्हणजे, आपला तयार माल त्यांनी परदेशात निर्यात केला तर, त्यांना या शुल्काच्या ५० टक्के एवढी रक्कम परत मिळते. याच कारणास्तव हे कारखाने आपला अधिकाधिक माल परदेशात निर्यात करतात. १९७९-८० या वित्तीय वर्षामध्ये परदेशामध्ये निर्यात केलेल्या चष्म्याच्या फ्रेम्सची देशनिहाय आकडेवारी समितीकडे उपलब्ध असून ती खालीलप्रमाणे आहे :—

| अनुक्रमांक | देशाचे नाव | एकूण निर्यात (१९७९-८०) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | अबुदाबी .. .. .. | ६४,६४४ |
| २ | आफ्रिका .. .. .. | १८,११,४५८ |

| अनुक्रमांक | देशाचे नाव | एकूण निर्यात (१९७९-८०) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| ३ | ऑस्ट्रिया | १०,२३७ |
| ४ | बेहरिन | २,६०,७८८ |
| ५ | ऑस्ट्रेलिया | ३,२५,१२० |
| ६ | बेल्जिअम | ११,०८२ |
| ७ | कॅनडा | ६२,६०५ |
| ८ | दुबई | ४७,७२१ |
| ९ | इजिप्त | १,३१,३०३ |
| १० | इथिओपिन | ५७,९३६ |
| ११ | फिजी | ४५,३८४ |
| १२ | फ्रान्स | ८,४०४ |
| १३ | फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी (प. जर्मनी) | ६,१४० |
| १४ | इराक | २,८८,०४३ |
| १५ | आयर्लंड | ६३,६५९ |
| १६ | जॉर्डन | ८९० |
| १७ | दिजीबुटी | ३,१२० |
| १८ | केनया | ४५,५८६ |
| १९ | केनया | १,७१,२२५ |
| २० | लायबेरिया | १९,००६ |
| २१ | मलेशिया | ४,३७० |
| २२ | मालवी | ३२,२३५ |
| २३ | मॉरिशस | ३,२६६ |
| २४ | मस्कत व ओमन | १,२०,५१३ |
| २५ | नायजेरिया | ३,३४,२७७ |
| २६ | पीडीआरवाय (एडन) | ४०,७८१ |
| २७ | कतार | ७,५०० |
| २८ | सौदी अरेबिया | ४४,८७,९८५ |
| २९ | सोमालिया | ८०,२५८ |
| ३० | स्पेन | ३९,१८२ |
| ३१ | श्रीलंका | १,२५,९५३ |
| ३२ | सुदान | १,८०,५६२ |
| ३३ | सुरीनाम | १,७६८ |
| ३४ | स्विझर्लंड | २६,३६७ |

| अनुक्रमांक (१) | देशाचे नाव (२) | एकूण निर्यात (१९७९-८०) (३) |
|---|---|---|
| ३५ | सिरिया .. .. .. | ८,०३२ |
| ३६ | यू. के.—ग्रेट ब्रिटन .. .. | ३,८३,१११ |
| ३७ | यु.एस.ए.—अमेरिका .. .. | १७,८८३ |
| ३८ | यु.एस.एस.आर.—रशिया .. .. | ६,६१,९९,३१९ |
| ३९ | युगोस्लाव्हिया .. .. .. | २,६४,२३८ |
| ४० | वाय. ए. आर. .. .. .. | ५,८९,५५१ |
| ४१ | झांबिया .. .. .. | ४३,१६३ |
| | एकूण .. | ७,६३,६४,७६५ |

२.६. **बाजारपेठ.**—वर नमूद केल्याप्रमाणे परदेशी बाजारपेठेमध्ये या मालाला प्रचंड मागणी असल्यामुळे अनेक छोटे छोटे कारखाने देखील आपला माल निर्यात करण्याच्या प्रयत्नात असतात. त्यामुळे स्थानिक बाजार पेठेतसुद्धा मालाचा तुटवडा जाणवतो. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ३० वर्षांमध्ये संबंध देशातील शिक्षण कार्यक्रमांचा झपाट्याने प्रसार झाल्यामुळे देशातील चष्म्याच्या फ्रेम्सची मागणी देखील वाढलेली आहे. तसेच, भारतातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जाही बराच वाढलेला असून उन्हात वापरावयाच्या चष्म्यांची मागणी देखील भरपूर प्रमाणात वाढलेली आहे. तथापि, या उद्योगाच्या मालकांना यातून फायद्याचा पुरेसा वाटा मिळत नसून या उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देणाऱ्या घाऊक विक्रेत्यांना याचा जास्तीत जास्त फायदा मिळतो, ही वस्तुस्थिती आहे. सध्या निर्मात्यांची सुसज्ज संघटना असून मालकांना नफ्याचा योग्य तो वाटा मिळावा या दृष्टीने ती संघटना चर्चासत्र आयोजित करून, मासिके चालवून, मोठमोठ्या शहरांमध्ये मालाच्या विक्रीसाठी प्रदर्शने भरवून या समस्येला तोंड देण्याचा प्रयत्न करीत आहे. नुकतेच गेल्या वर्षी ताजमहाल हॉटेल व ऑबेरॉय टॉवरमध्ये अशा प्रकारची दोन प्रदर्शने भरवण्यात आली होती. त्यांच्या या प्रयत्नावरून या उद्योगातील निर्माते नजीकच्या भविष्यकाळात आपली प्रगती करतील असे वाटते.

२.७. **उत्पादन प्रक्रिया.**—या उद्योगाच्या छोट्या छोट्या कारखान्यांमध्ये इंजेक्शन मोल्डिंग पावडर प्रक्रिया वापरण्यात येते. अशा कारखान्यांमध्ये १० पेक्षा कमी कामगार कामाला असतात. कच्चा माल म्हणजे, देशी प्लास्टिक पावडर यंत्रामध्ये घातली जाते व बहुतेक ही यंत्रे हाताने चालवावयाची असतात. उष्णता व दाब दिल्यानंतर त्याला (मालाला) कायमचा आकार प्राप्त होतो. उष्णता दिल्यावर हा माल मऊ होतो व थंड केल्यावर कठीण होतो. प्लास्टिक पावडरपासून तयार होणाऱ्या चष्म्याच्या फ्रेम्स मुख्यत्वेकरून दोन भागात असतात. एक म्हणजे, पुढील बाजू आणि दुसरी बाजू म्हणजे (उजवी व डावी) होय. प्रत्येक नमुन्यासाठी व आकारासाठी वेगवेगळे साचे लागतात व हे साचे यंत्रावर बसवले जातात. बहुतेक लघु उद्योजक कारखाने हे साचे बाहेरून तयार करुन घेतात.

पुढील बाजू व डाव्या-उजव्या बाजू साचेकाम यंत्रावरून योग्यपणे तयार करून घेतल्यानंतर त्यांना योग्य स्थिती प्राप्त करून देण्यासाठी एका छोटया यंत्राद्वारे त्याच्या काडयांमध्ये तारा बसवल्या जातात. हे यंत्रसुद्धा हाताने च चालवावयाचे असते. या पुढील भागावर काचा बसवावयाच्या असतात. त्याच्या आतील व बाहेरील बाजूला आकार देण्याचे काम चालू असते. त्यानंतर पुढील भागास डाव्या-उजव्या बाजू जोडण्याचे काम केले जाते. शीटस् असल्यास, कामातील बदल म्हणजे, पुढील भाग व डाव्या-उजव्या बाजू हाताने चालवावयाच्या विभागाणी यंत्रावर तयार केल्या जातात आणि स्क्रू, बिजागरी वगैरे हाताने बसवले जातात. त्यानंतर लेव्हलिंगची प्रक्रिया केली जाते. धातूच्या वापराच्या बाबतीत मात्र हा कारखाना म्हणजे एखाद्या अभियांत्रिकी कार्यशाळेप्रमाणे असतो व त्यामध्ये फ्रेम, पुढचा भाग, बाजू या सर्व गोष्टी तारांच्या सहाय्याने तयार केल्या जातात. फ्रेम्सचे साचे तयार करण्याचे मुख्य काम साचे काम यंत्रावरच होते आणि फ्रेम्सच्या साच्या बाबतच्या आणि परदेशी सेल्युलोज नायट्रेट/सेल्युलोज ॲसिटेट शीटस् आणि/किंवा सेल्युलोज ॲसिटेट ऑफ कटस् याबाबतच्या अन्य सर्व प्रक्रिया सर्वसाधारणपणे सारख्याच असतात व त्या खालीलप्रमाणे असतात:—

**(क) चष्म्याचा पुढील भाग व त्यातील दोन्ही डोळयांना नाकावर जोडणारा सांधा तयार करणे**

| | | |
|---|---|---|
| १ | अपेक्षित आकारमाने मिळविण्यासाठी गोल करवतीने शीट कापणे. .. | स्वयंचलित नसलेल्या व हाताने चालवावयाचे यंत्र. |
| २ | वेधनीद्वारे कापलेल्या तुकडयावर भोके पाडणे .. | वरील (१) प्रमाणे हस्तचलित यंत्र. |
| ३ | फ्रेम्सच्या आतल्या व बाहेरच्या बाजूस वेगवेगळे आकार देणे. | स्वयंचलित नसलेल्या व हाताने चालवावयाच्या यंत्राने. |
| ४ | आवश्यक त्या आकारमानाच्या/रचनेच्या कापलेल्या तुकडयांना घासून आकार देणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ५ | काच बसविण्यासाठी हात करवतीने किंवा आकारक यंत्राद्वारे खाचा करणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ६ | नाकावरील सांध्यात सुधारणा करण्यासाठी निर-निराळ्या आकारामध्ये/रचनेमध्ये घासणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ७ | पाण्याच्या वाफेद्वारे नाकाच्या सांध्याला उंचवटा तयार करणे. | .. पूर्णपणे हाताने. |
| ८ | पॉलिश करण्याची पूर्वतयारी म्हणून पृष्ठभाग सुरीने खरवडून गुळगुळीत करणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ९ | हात कानसीने वक्राकार व/किंवा गोलाकार देणे .. | .. वरीलप्रमाणे. |
| १० | खरवडून काढलेल्या रद्दी मालामधून नाकावरील पॅड तयार करणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ११ | नाकावरील सांध्याला रसायनाच्या सहाय्याने नाका-वरील पॅडस् जोडणे. | .. वरीलप्रमाणे. |
| १२ | आवश्यक ती जाडी व रचना मिळविण्यासाठी हात-कानसीने नाकाच्या पॅडस्ना आकार देणे. | .. वरीलप्रमाणे. |

| | | |
|---|---|---|
| १३ | भिंगांना आवश्यक तो आकार देण्यासाठी पाण्यामध्ये उकळवून ती वाकवणे व वक्राकार करणे. | स्वयंचलित नसलेल्या व हाताने चालवावयाच्या यंत्राने. |
| १४ | फ्रेम्समध्ये भिंगे बसविण्यासाठी आकारक यंत्राद्वारे खाचा पाडणे. | हस्तचलित यंत्राने. |
| १५ | खाचांमध्ये बिजागरी बसवणे .. .. | पूर्णपणे हाताने. |
| १६ | हाताने बसविलेल्या टाचण्या कापणे .. .. | वरीलप्रमाणे. |
| १७ | बिजागरी बसविण्यासाठी भोके पाडणे .. .. | वरीलप्रमाणे. |
| १८ | बिजागरींवर रिबिट करून पिना लावणे .. | वरीलप्रमाणे. |

## (ख) चष्म्याच्या काड्या तयार करणे (उजवी व डावी)

| | | |
|---|---|---|
| १ | गोल करवतीने डावी व उजवी बाजू स्वतंत्रपणे कापणे (काही ठिकाणी सामानाची बचत करण्यासाठी हे काम चाकूने केले जाते). | हस्तचलित यंत्राने करावयाचे काम. |
| २ | कापलेल्या तुकड्यांवर रचनेनुसार स्वतंत्रपणे डावी व उजवी बाजू घासणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ३ | तारा आत घालून बाजू भक्कम करण्याची पूर्वतयारी म्हणून चाकूने कडा गुळगुळीत करणे. | .. पूर्णपणे हाताने. |
| ४ | तारा आत घालून बाजू भक्कम करण्यापूर्वी या बाजू तेलामध्ये बुडवून ठेवणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ५ | प्रत्येक बाजूस हाताने उचलण्यासाठी आकार देणे व त्याच आकारात मजबूत करण्यासाठी यंत्रात घालणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ६ | हाताने आकार निश्चित करण्यासाठी बाजूंच्या पोकळीमध्ये तारा घालणे पूर्णपणे एका व्यक्तीचे काम. | .. वरीलप्रमाणे. |
| ७ | हात कानसीने बाजूवरील जादा भाग काढून टाकणे | .. वरीलप्रमाणे. |
| ८ | पॉलिश करण्याची पूर्वतयारी म्हणून चाकूने खरवडून या बाजू गुळगुळीत करणे. | .. वरीलप्रमाणे. |

## (ग) बफिंग करणे व पॉलिश करणे

| | | |
|---|---|---|
| १ | सर्व नव्हे तर काही कारखान्यांमध्ये ड्रम पॉलिश केले जाते. | |
| २ | प्युमिक पावडरने कच्चे पॉलिश करणे .. .. | हस्तचलित यंत्राने. |
| ३ | प्युमिक पावडरने आकर्षक पॉलिश करणे .. | वरीलप्रमाणे. |
| ४ | प्युमिक पावडरचे कण काढून टाकून स्वच्छ करणे .. | पूर्णपणे हाताने. |
| ५ | चकाकी आणणाऱ्या दांड्याने सर्व ठिकाणी सारखे बफ पॉलिश करणे. | हस्तचलित यंत्राने. |

| | | |
|---|---|---|
| ६ | चकाकी आणणाऱ्या दांड्याने करावयाचे पॉलिशचे काम पूर्ण करणे. | हस्तचलित यंत्राने. |
| ७ | तयार फ्रेम रॉकेलने स्वच्छ करणे | .. पूर्णपणे हाताने. |
| ८ | फ्लॅनेल कापडाने शेवटचे पॉलिश करणे .. | .. वरीलप्रमाणे |
| ९ | बिजागऱ्यांना चकाकी आणण्यासाठी भाटयांसकट प्रत्येक बिजागिऱ्यांना हाताने बफिंग करणे. | .. वरीलप्रमाणे. |

### (घ) मालाची पुडकी बांधणे व लेबले लावणे

| | | |
|---|---|---|
| १ | सर्व फ्रेम्सचे आकार, लेव्हल, रिबीट, काच इत्यादींची बारकाईने तपासणी करणे. | पूर्णपणे हाताने. |
| २ | यंत्राने चष्म्याच्या फ्रेमवर खुणा, आकार इ. गोष्टी उमटवणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ३ | प्रत्येक फ्रेम अंतिमरित्या फ्लॅनेलच्या कापडाने स्वच्छ करणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ४ | कापडामध्ये आणि/किंवा जिलेटिनच्या कागदी पेटी-मध्ये फ्रेम्स् ठेवणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ५ | व्यापाऱ्याला हवे असेल-त्याप्रमाणे किंवा डझनाप्रमाणे पेटया/खोके भरणे. | .. वरीलप्रमाणे. |
| ६ | पेटयांवर बनावट आकार, रचना इत्यादी लिहून लेबल लावणे. | . वरीलप्रमाणे. |

२.८. **विद्यमान वेतनें व सेवाशर्ती.**—सध्या या उद्योगामध्ये कामाला असलेल्या कामगारांमध्ये पुरुष, स्त्रिया व मुले असून त्यांच्यापैकी बहुतेक अशिक्षित आहेत् हे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. छोटया कारखान्यांमध्ये बाहेरील काही कामगारांची मदत घेऊन मालक स्वतःच काम करीत असतो. कधी कधी मालकाच्या कुटुंबातील व्यक्ती देखील कारखान्यात कामे करत असतात. यापैकी बहुतेक कारखाने राज्य कामगार विमा योजना, भविष्यनिर्वाह निधी अधिनियमामध्ये मोडत नाहीत. काही ठिकाणी तर या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आलेल्या रजाविषयक सुविधा देखील कामगारांना मिळत नाहीत. लहान कारखान्यामधील कामगारांची वेतन पातळी व वर्गीकरण निश्चित करण्यात आलेले नाही. त्यांच्यापैकी बहुतेकांची संघटना नाही व ते कारखान्यांच्या जवळपास झोपडयांमध्ये राहतात. बऱ्याचशा कारखान्यांमध्ये मालक स्वतःच कामगारांचे वेतन, सेवाशर्ती, कामाचे तास इत्यादी गोष्टी निश्चित करतात. फक्त काही कारखान्यांमधील कामगार संघटित असून काही अधिनियमान्वये मिळणारे फायदे आता त्यांना उपलब्ध झालेले आहेत. अगदी थोडया कारखान्यांमध्ये कामगार व मालक यांच्या प्रतिनिधींमध्ये कायदेशीर करार झालेले आहेत. १०६ कारखान्यांपैकी फक्त या कारखान्यांमधील कामगारांची मूळ वेतने व एकूण वेतने ही मुंबई कामगार ग्राहक मूल्य निर्देशांकाशी जोडण्यात आलेली असून महागाईप्रमाणे त्यांच्या वेतनात वाढ करण्यात येते. सर्वसाधारणपणे कामाच्या स्वरूपानुसार दैनिक वेतनाच्या आधारे वेतन निश्चित केले जाते. काही ठिकाणी उक्त्या कामाची पद्धत असल्यामुळे कामगारांना यांच्या जास्तीत जास्त उत्पादकतेमुळे चांगल्यापैकी एकत्रित वेतन मिळते.

योग्य व न्याय्य आधारावर किमान वेतन निश्चित करण्याची समितीची तीव्र इच्छा असल्यामुळे समितीने चष्म्याच्या फ्रेम्स् तयार करणाऱ्या व्यवसायांमध्ये सध्या प्रचलित असलेल्या वेतन श्रेणींचा अभ्यास करण्याचे ठरवले आहे. ३८ कारखान्यांकडून कुशल, अर्धकुशल व अकुशल कामगारांना देण्यात येणाऱ्या कमाल व किमान वेतनाबाबतची माहिती मिळविण्यात आली व ती माहिती जोडपत्र "च" मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

२.९. **तत्सम लघुउद्योगांमधील वेतने व सेवाशर्ती.**—या उद्योगाप्रमाणे असलेल्या लघु-उद्योगामध्ये काम करणाऱ्या बहुतेक कामगारांचा आता किमान वेतन अधिनियम, १९४८ खाली समावेश करण्यात आलेला आहे; काहींच्या बाबतीत त्यांचे किमान वेतन सुधारण्यासाठी नवीन समित्याही नियुक्त केलेल्या आहेत. याबाबतीत चष्म्याच्या फ्रेम्स् तयार करणाऱ्या व्यवसायातील कामगारांना जेमतेम पोटापुरते वेतन दिले जाते असे म्हणता येईल. परिणामी, या उद्योगामध्ये फारच थोडे कामगार कायम राहतात; आणि जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा अन्य उद्योगा-मध्ये काम मिळविण्याचा प्रयत्न करत राहतात. यामुळे या उद्योगामध्ये कुशल कामगारांचा सदोदित तुटवडाच असतो. सर्वसाधारणपणे कामगार शिकाऊ म्हणून येथे कामाला लागतात व काही महिन्यातच या उद्योगामधील अर्धकुशल म्हणता येईल अशा स्वरूपाचे काम स्वतंत्रपणे करण्यास शिकतात. प्लॅस्टिक उद्योग व भांडी उद्योग या दोन मुख्य उद्योगांची या उद्योगाशी तुलना करता येईल. या दोन उद्योगांच्या छोटया कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या व या उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या सारखीच आहे. उद्योग उभारण्यासाठी लागणारे भांडवल देखील तुलना करण्यासारखे आहे. त्यासाठी लागणारे कौशल्य देखील सारखे आहे. परंतु, किमान वेतन अधिनियम लागू केल्यामुळे त्या उद्योगांमधील कामगारांचे वेतन बरेच वाढले असून या उद्योगामधील कामगार मात्र मागेच राहिलेले आहेत. वरील निवेदनावरून चष्म्याच्या फ्रेम्स् तयार करणाऱ्या व्यवसायातील कामगारांना मिळणारे वेतन हे वरील तुल्यबळ उद्योगांमधील काम-गारांना मिळणाऱ्या वेतनापेक्षा खूपच कमी आहे हे गृहित धरण्यास हरकत नाही. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या व्यवसायातील कामगारांचे किमान वेतन निश्चित करण्याच्या प्रश्नावर विचार करताना समितीने खालील उद्योगांसाठी आधीच नियुक्त केलेल्या समित्यांनी तयार केलेली सूत्रे त्यांचे निर्णय व शिफारशी विचारात घेतल्या आहेत.

**तक्ता "क"**

| उद्योगाचे नाव (१) | कामगारांचा वर्ग (२) | क्षेत्र एक (३) | क्षेत्र दोन (४) |
|---|---|---|---|
| | | रुपये | रुपये |
| फाऊंटन पेन/बॉल पेन उद्योग | कुशल | ८.४० | ८.०० |
| | अर्धकुशल | ६.८५ | ६.४५ |
| | अकुशल | ६.५० | ६.१० |
| | लिपिक | २२२.०० | १८७.०० |

टीप.—याच्या व्यतिरिक्त प्रत्येक कामगाराला निर्देशांकाशी जोडलेली विशेष भत्ता मिळतो.

तक्ता "ख"

| उद्योगाचे नाव | कामगारांचा वर्ग | क्षेत्र एक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | रुपये (प्रतिदिन) |
| रबर उद्योग .. | कुशल .. | ७.०० |
| | अर्धकुशल .. | ६.०० |
| | अकुशल .. | ५.०० |

टीप.—या व्यतिरिक्त प्रत्येक कामगाराला निर्देशांकाशी जोडलेला विशेष भत्ता मिळतो.

तक्ता "ग"

| उद्योगाचे नाव | कामगारांचा वर्ग | क्षेत्र एक | क्षेत्र दोन | क्षेत्र तीन |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | रुपये | रुपये | रुपये |
| प्लॉस्टिक उद्योग .. | अतिकुशल (अ) | प्रतिदिन ११.०० | प्रतिदिन १०.०० | प्रतिदिन ९.०५ |
| | अतिकुशल (ब) | प्रतिदिन १०.०० | प्रतिदिन ९.०० | प्रतिदिन ८.७५ |
| | कुशल .. | प्रतिदिन ८.९० | प्रतिदिन ८.७० | प्रतिदिन ८.५० |
| | अर्धकुशल (अ) | प्रतिदिन ७.५० | प्रतिदिन ७.३० | प्रतिदिन ७.१० |
| | अर्धकुशल (ब) | प्रतिदिन ७.२० | प्रतिदिन ७.०० | प्रतिदिन ६.८० |
| | अकुशल .. | प्रतिदिन ७.०० | प्रतिदिन ६.८० | प्रतिदिन ६.६० |
| | लिपिक (अ) | दरमहा २३५.०० | दरमहा २२०.०० | दरमहा २००.०० |
| | लिपिक (ब) | दरमहा ३००.०० | दरमहा २८५.०० | दरमहा २५०.०० |

टीप.—या व्यतिरिक्त प्रत्येक कामगाराला निर्देशांकाशी जोडलेला विशेष भत्ता मिळतो.

तक्ता "घ"

| उद्योगाचे नाव | कामगारांचा वर्ग | क्षेत्र एक | क्षेत्र दोन | क्षेत्र तीन | क्षेत्र चार | क्षेत्र पाच |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| भांडी उद्योग .. | अकुशल .. | ७.८० | ७.२५ | ६.७० | ५.७० | ४.८० |
| | अर्धकुशल .. | ८.५० | ७.९० | ७.४० | ६.४० | ५.३० |
| | कुशल ग .. | ९.४० | ८.७५ | ८.३० | ७.१० | ५.९० |
| | कुशल ब .. | १०.३० | ९.५० | ९.०० | ७.८० | ६.५० |
| | कुशल अ .. | ११.३० | १०.३० | ९.९० | ८.४० | ७.०० |
| | पर्यवेक्षक .. | १४.१० | १३.१० | १२.४० | १०.५० | ८.८० |
| | लिपिक (दरमहा) | ३००.०० | २८०.० | २७५.० | २५०.०० | २२५.०० |

टीप.—या व्यतिरिक्त प्रत्येक कामगाराला निर्देशांकाशी जोडलेला विशेष भत्ता मिळतो.

# प्रकरण ३ रे

## समितीचे विचार

३.१. **समितीचे विचार.**—या उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांचे किमान वेतन दर निश्चित करण्याच्या बाबतीत समितीने बरीच चर्चा केली. त्यामध्ये जास्त दराने किमान वेतन निश्चित केल्यास ते देणे या उद्योगाच्या आवाक्यापलीकडचे होईल. कारण, या उद्योगामध्ये जे अनेक छोटे छोटे कारखाने आहेत ते या किमान वेतनाच्या उच्चतर दराचा जादा बोझा पेलण्यास असमर्थ आहेत असा मुद्दा मालकांच्या प्रतिनिधींनी वारंवार उपस्थित केला. अनेक छोटे छोटे कारखाने हा उद्योग कुटिरोद्योग म्हणून चालवत आहेत आणि रु. ५.०० ते १०.०० या दरम्यान किंवा त्याहूनही कमी वेतन ते कामगारांना देतात, ही गोष्ट खरी आहे. तसेच, ज्या उद्योगामधील ९० टक्क्यांहून अधिक कामे ही हाताने केली जातात आणि जो उद्योग वीज शक्तीच्या सहाय्याखेरीज देखील चालवता येतो त्या उद्योगास कुटीरोद्योगाशिवाय दुसरे काहीही म्हणता येणार नाही हेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. शिवाय मालकांची वेतन देण्याची क्षमताही विचारांत घेण्यात यावी असे त्या प्रतिनिधींनी ठासून सांगितले. अन्य महत्त्वाच्या उद्योगांमधील समितीने निश्चित केलेले वेतन दर देखील अतिशय जास्त आहेत असे या मालकांना वाटते. सध्या हा उद्योग फार मोठ्या आर्थिक संकटातून वाटचाल करीत असून कच्चा माल, वीज, रसायने व अन्य उपसाधनांच्या किमतीतील वाढ, वीजेचा तुटवडा आणि उत्पादन शुल्कातील चढती वाढ यामुळे या उद्योगास उत्तरोत्तर अधिक बोजा सहन करणे कठीण होत चालले आहे. किमान वेतन दरातील कोणत्याही प्रकारच्या अधिक वाढीमुळे या उद्योगाचा कणाच मोडून जाईल आणि परिणामी बेकारी निर्माण होईल. परंतु, वेतन अधिनियमाच्या प्रयोजनाचा विचार करण्यात आला. बेसुमार कमी वेतन देऊन कामगारांकडून कष्ट करून घेण्यास, त्यांची पिळवणूक करण्यास प्रतिबंध करणे हेच मूळी किमान वेतन अधिनियम संमत करण्यामागील तत्त्व आहे.

या उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांना दिली जाणारी सध्याची वेतने इतकी कमी आहेत की, त्यांना आपल्या आयुष्याच्या किमान गरजाही भागवणे शक्य होत नाही किंवा केवळ तीन उपभोग्य युनिटे असणाऱ्या कुटुंबाचा उदरनिर्वाहही चालवता येत नाही असे कामगार प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले. वेतन देण्याची क्षमता निश्चित करण्यासाठी एखाद्या विशिष्ट प्रदेशातील एखाद्या उद्योगाची क्षमता विचारात घेण्यात यावी आणि संबंधित प्रदेशातील उद्योगाच्या विकास व योग्य अशी प्रतिनिधिक उदाहरणे घेऊन त्याबाबत खात्री करून घ्यावी. कामगारांचे राहणीमान सुधारण्याच्या बाबतीत योग्य लक्षच देण्यात आलेले नाही. काही वर्गातील कामाचे स्वरूप हे आरोग्यास धोक्याचे व अपायकारक आहे. या उद्योगातील कामगारांचे तुटपुंजे उत्पन्न त्यांच्या केवळ अन्न व इतर सामान्य गरजा भागविण्यास देखील फार क्वचितच पुरे पडते. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याचा व्यवसाय हा प्लॉस्टिक व्यवसायामध्ये समाविष्ट असल्यामुळे काहीही झाले तरी या व्यवसायातील कामगारांचे शासनाकडे शिफारस करावयाचे किमान वेतन दर हे प्लॉस्टिक उद्योगातील कामगारांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतन दरापेक्षा कमी असता कामा नयेत.

दी बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टिकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने प्लॉस्टिक उद्योगामधून हा व्यवसाय वगळण्यासाठी व त्याचे किमान वेतन दर या व्यवसायास लागू न करण्यासाठी अभिवेदन केलेले आहे. (जोडपत्र "च")

समितीच्या सदस्यांनी मुंबईतील काही कारखान्यांना भेटी दिल्या. या उद्योगातील कारखाने हे अत्यंत छोटे असून त्यामध्ये एक त दहाच्या दरम्यान कामगार कामाला आहेत आणि काही ठिकाणी तर मदतनीस कामगार किंवा स्वतःच्या कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या सहाय्याणे स्वतः मालकच यंत्रावर काम करतो.

बहुतेक कामगार रोजदारीवर कामाला लावलेले आहेत हे येथे नमूद केले पाहिजे; आणि जेव्हा जेव्हा आवश्यक वाटेल तेव्हा ते हा थोड्या कालावधीसाठी नैमित्तिक कामगार देखील कामाला लावले जातात व त्यांना अगदीच कमी वेतन देण्यात येते.

# प्रकरण ४ थे

## शिफारशी

४.१. **वेतनविषयक कल्पना.**—किमान वेतन अधिनियम, १९४८ संमत होणे ही घटना म्हणजे, देशातील कामगारविषयक कायद्यांच्या इतिहासामधील एक ठळक व वैशिष्टयपूर्ण घटना होय. वेतने ही संपूर्णपणे बाजारपेठेच्या बलाबलावर निश्चित करणे योग्य नाही हे या अधिनियमाने मान्य केले. एकदा कायद्याने विहित केलेल्या सूत्रानुसार किमान वेतन दर निश्चित करण्यात आले की, मालकावर ते देणे बंधनकारक ठरते—मग ते देण्याची त्याची क्षमता असो व नसो—आणि आपल्या कामगारांना उक्त वेतने देण्याबाबतची आपली अक्षमता प्रकट करण्यास मालकाला मुभा राहात नाही.

किमान वेतनावर विचारविमर्श करण्यापूर्वी वेतन पातळीवर चर्चा करताना सध्या अस्पष्ट वाटणाऱ्या काही शब्दप्रयोगांचे अर्थ स्पष्ट करणे आवश्यक आहे. सन १९४८ पासून वेतन समस्यांवर चर्चा करताना प्रचलित झालेले शब्दप्रयोग म्हणजे, (१) कायदेशीर किमान वेतन; (२) निव्वळ किंवा मूळ किमान वेतन ; (३) किमान वेतन; (४) न्याय्य वेतन; (५) निर्वाह वेतन; आणि (६) गरजांवर आधारित किमान वेतन. पहिला शब्दप्रयोग किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या उपबंधाद्वारे प्रथम प्रचारात आला. दुसरा शब्दप्रयोग न्यायालयीन निवाडे वा निर्णयांमध्ये वापरला जातो. त्यानंतरचे तीन शब्दप्रयोग न्याय्य वेतन समितीच्या (C.F.W.) अहवालामध्ये प्रथत: वापरले गेले व शेवटचा शब्दप्रयोग भारतीय कामगार परिषदेच्या जुलै, १९५७ मध्ये भरलेल्या पंधराव्या अधिवेशनातील निर्णयामध्ये प्रथमत: वापरला गेला.

कायदेशीर किमान वेतन म्हणजे किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम ३ अन्वये निश्चित करण्यात आलेले व उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये शासनाद्वारे अधिसूचित करण्यात आलेले वेतन होय.

किमान वेतन अधिनियम, १९४८ मध्ये किमान वेतनाबाबत कोणतीही निश्चित व्याख्या देण्यात आलेली नाही वा ज्यांच्या आधारे असे वेतन निश्चित करता येईल अशी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देण्यात आलेली नाहीत. किमान वेतन निश्चित करण्यासाठी कोणत्याही प्रकारची एकरूप तत्त्वे नसल्यामुळे किमान वेतन दर हे पूर्णपणे कामगार व त्याचे कुटुंब यांच्या आवश्यकतांवर आधारित असावेत असे समितीचे मत होते. समितीने आपल्या चर्चा व विचारविमर्शामध्ये मालक व कामगार या दोहोंचेही दृष्टीकोन विचारात घेतलेले आहेत.

शिफारस करावयाच्या किमान वेतन दरामुळे कामगारांना केवळ सामाजिक न्यायच मिळता कामा नये तर, त्याच्या बरोबरीने उद्योगाचा वेगाने विकास होणे, कामगारांना स्थिर स्वरूपाच्या वाढत्या प्रमाणात नोकऱ्या मिळणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. किमान वेतनामुळे कामगाराचा केवळ उदरनिर्वाहच भागला पाहिजे असे नव्हे तर, त्याची कार्यक्षमता टिकविण्याच्या दृष्टीने त्याला काही प्रमाणात शिक्षण; वैद्यकीय गरजा व इतर सुखसोयी इत्यादींचा खर्च भागविता येईल इतपत त्यामध्ये तरतूद असली पाहिजे.

बऱ्याच प्रमाणावर चर्चा व प्रचलित वेतनदरांचा हिशोब केल्यानंतर सप्टेंबर, १९८० च्या अखेर-पर्यंतची ग्राहक मूल्य निर्देशांकातील वाढ विचारात घेऊन समितीने चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या कारखान्यांमध्ये कामगार करत असलेल्या कामाच्या स्वरूपांच्या आधारे त्यांचे वर्गीकरण करून त्यानुसार त्यांचे खालीलप्रमाणे किमान वेतन दर असावेत असा निर्णय घेतला :-

| अनुक्रमांक (१) | कामगारांचा वर्ग (२) | क्षेत्र एक (३) | क्षेत्र दोन (४) |
|---|---|---|---|
| | | रुपये | रुपये |
| १ | अतिकुशल .. .. .. .. | प्रतिदिन ११ | प्रतिदिन १० |
| २ | कुशल .. .. .. .. | प्रतिदिन ९ | प्रतिदिन ८ |
| ३ | अर्धकुशल .. .. .. .. | प्रतिदिन ८ | प्रतिदिन ७ |
| ४ | अकुशल .. .. .. .. | प्रतिदिन ७ | प्रतिदिन ६ |
| ५ | लिपिक–टंकलेखक .. .. .. | दरमहा २६० अधिक (२६ दिवसां-साठी विशेष भत्ता) | दरमहा २३४ अधिक (२६ दिवसां-साठी विशेष भत्ता) |

४.२. **कामगारांचे वर्गीकरण.**—मालकांनी प्रश्नावलीला दिलेल्या उत्तरामधून मिळालेल्या माहितीवरून असे निदर्शनास आले की, या संपूर्ण उद्योगामध्ये यापूर्वी केव्हाही कामगारांचे कामानुसार कोणत्याही प्रकारे वर्गीकरण झालेले नव्हते. एकच काम एका कारखान्यात कुशल म्हणून गणले जात असे तर दुसऱ्या कारखान्यामध्ये अर्धकुशल म्हणून गणले जात असे. उदा. खालील तक्त्या-वरून कामाचे परस्परव्यापी वर्गीकरण दिसून येते :—

| अनुक्रमांक (१) | कुशल (२) | अर्धकुशल (३) | अकुशल (४) |
|---|---|---|---|
| १ | बफ पॉलीशर, फिटर, मोल्डर, वेल्डर. | बफ-मेन, फिटर, मोल्डर, वेल्डर. | बफ-मेन, फिटर. |

समितीने आपल्या भेटीमध्ये कामगार करत असलेल्या कामांच्या स्वरूपांचे सूक्ष्म अवलोकन केले व कुशलतेनुसार त्या कामांचे विविध वर्गांमध्ये वर्गीकरण करून त्याची एक सूची तयार केली:—

(१) अकुशल स्वरूपाच्या कामाला कौशल्याची आवश्यकता नसते. मजूर, मदतनीस, सफाईगार इत्यादींसारखे कोणतेही कौशल्य अवगत नसलेली कोणतीही व्यक्ती कोणतेही कष्टाचे काम करण्यास सक्षम असते;

(२) अर्धकुशल स्वरूपाचे काम करण्यास साध्या कौशल्याची आवश्यकता असते. अर्ध-कुशल कामगार हा शीट कटिंग, सुरी कानसकाम इत्यादी कामे यंत्राच्या अगर साधनांच्या सहाय्याने करतो;

(३) कुशल स्वरूपाचे काम करण्यासाठी त्या कामगारास आपल्या कामाचे संपूर्ण ज्ञान अवगत असावे लागते. तसेच, ते स्वतंत्रपणे व कुशलतेने करण्याची क्षमता त्याच्याकडे असावी लागते;

(४) अतिकुशल स्वरूपाचे कामामध्ये मूलत: आराखडे तयार करणे सर्व प्रकारच्या कामांचे संपूर्ण ज्ञान अवगत असणे अशी कल्पना आहे. तथापि, या व्यवसायामध्ये बरीचशी कामे अत्यंत साधी असून ती अकुशल स्वरूपामध्ये मोडतात आणि अशी कामे आम्ही त्या वर्गाखाली नमूद केली आहेत.

चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याची प्रक्रिया साधी असल्यामुळे बहुसंख्य कामे ही अर्धकुशल स्वरूपाची आहेत :—

शेवटी समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे :—

चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांची वर्गवारी: (१) अकुशल; (२) अर्धकुशल; (३) कुशल; (४) अतिकुशल व (५) लिपिक व अन्य अशा वर्गांमध्ये करण्यात यावी.

४. ३. **वेतने ग्राहक मूल्य निर्देशांकांशी जोडणे.**—अत्यावश्यक वस्तूंच्या किंमतीमध्ये होणारी सतत वाढ लक्षात घेता व कामगारांच्या राहणी खर्चात झालेली वाढ लक्षात घेता परिच्छेद क्र. ४-१ मध्ये शिफारस केलेल्या मूळ किमान वेतनाव्यतिरिक्त किमान वेतन दर हे खालील तत्त्वांच्या आधारे ग्राहक मूल्य निर्देशांकांशी जोडणे आवश्यक आहे अशी समिती शिफारस करत आहे.

मुंबई कामगारवर्ग ग्राहक मूल्य निर्देशांक १६७५ (जुनी मालिका) त्याच्या अनुसार १६७५ वरील प्रत्येक एकांकाच्या वाढीस देय असलेल्या विशेष भत्याचा दर हा प्रत्येक क्षेत्रातील प्रत्येक एकांकाच्या वाढीस दर दिवशी प्रत्येक एकांकास एक पैसा या दराने मोजला जाईल. ग्राहक मूल्य निर्देशांक १६७५ हा आधारभूत म्हणून घेऊन ३ महिन्यातील सरासरीच्या आधारे ग्राहक मूल्य निर्देशांकातील वाढ मोजण्याचे समितीने ठरवलेले आहे. तसेच, हा विशेष भत्ता देण्याबाबतची अंमलबजावणी देखील लगेच करण्याचे समितीने ठरवलेले आहे.

४. ४. **क्षेत्रे (परिमंडळ).**—क्षेत्रांच्या संबंधात कामगार प्रतिनिधी: (१) बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा क्षेत्र; आणि (२) क्षेत्र १ मध्ये समाविष्ट न केलेले राज्यातील उरलेले सर्व क्षेत्र अशी दोन क्षेत्रे हवी आहेत. मालक प्रतिनिधींनी (१) बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा क्षेत्र; (२) नागपूर, पुणे, सोलापूर व कोल्हापूर, इत्यादी नगरपालिका क्षेत्रे; आणि (३) राज्यातील उरलेले सर्व क्षेत्र अशी तीन क्षेत्रे असावीत असे सुचविलेले आहे. थोड्याशा चर्चेनंतर समितीने एकूण राज्याचे क्षेत्र दोन क्षेत्रातच विभागण्याचा निर्णय एकमुखाने घेतला ती क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत :–

**क्षेत्र एक :** बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा.

**क्षेत्र दोन :** क्षेत्र एक मध्ये समाविष्ट न केलेले महाराष्ट्र राज्याचे उरलेले सर्व क्षेत्र.

## प्रकरण ५ व

# शिफारशींचा सारांश

५.१. अनुसूची.—समितीने खालीलप्रमाणे किमान वेतन दरांची शिफारस केलेली आहे :—

अनुसूची

| अनुक्रमांक | कामगारांचा वर्ग | दर क्षेत्र-एक | दर क्षेत्र-दोन |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | रुपये | रुपये |
| | अकुशल | | |
| १ | मदतनीस .. .. .. .. | प्रतिदिन ७.०० | प्रतिदिन ६.०० |
| २ | सर्वसाधारण कामगार (अन्यथा विनिर्दिष्ट केलेले नसल्यास) | | |
| ३ | मजूर .. .. .. .. | | |
| ४ | सफाईगार .. .. .. | | |
| ५ | पहारेकरी .. .. .. .. | | |
| ६ | चपराशी .. .. .. .. | | |
| ७ | पाणीवाला .. .. .. | | |
| ८ | स्वच्छक .. .. .. .. | | |
| ९ | आवेष्टक/पॅकर .. .. .. | | |

टीप.—वरील नोंदींमध्ये मोडणारे अकुशल स्वरूपाचे काम करणारे व कोणत्याही नावाने ओळखले जाणारे कामगार.

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | कामगारांचा वर्ग | दर: क्षेत्र-एक | दर: क्षेत्र-दोन |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | रुपये | रुपये |
| | अर्धकुशल | | |
| १ | काच कापणे (कडांना आकार देणे)— (१) विधण काम करणे ; (२) आतल्या व बाहेरच्या दोन्ही बाजूंनी काच तासणे. | प्रतिदिन ८.०० | प्रतिदिन ७.०० |
| २ | पार्श्व साचेकार (तार आत घालणारा) .. | | |
| ३ | सुरी कानसकाम .. .. .. | | |
| ४ | पुष्टिपत्र घट्ट बसविणे, सांधणे, जोडकाम .. | | |
| ५ | नोज बेंडींग .. .. .. | | |
| ६ | स्क्रू बसविणे .. .. .. | | |
| ७ | ड्रम ऑपरेटर आणि / किंवा इन्स्ट्रक्टर .. | | |
| ८ | वेधन .. .. .. .. | | |
| ९ | विजागरींसाठी कप्पा (खाचा) बनविणे .. | | |
| १० | विजागऱ्या जोडणे, रिविट करणे इत्यादी | | |
| ११ | दांडीचे टोक वाकविणे .. .. .. | | |
| १२ | साचे कामगाराचा मदतनीस .. .. | | |
| १३ | झाळकामाच्या यंत्रावर धातूच्या तुकड्यांचे झाळकाम करणे. | | |
| १४ | बफिंग : (१) ग्राईंडिंग (मातीवाला) आणि (२) फेल्ट ऑपरेशन. | | |
| १५ | शिक्के मारणे .. .. .. | | |

टीप.—वरील नोंदींमध्ये मोडणारे अर्धकुशल स्वरूपाचे काम करणारे व कोणत्याही नावाने ओळखले जाणारे कामगार.

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | कामगारांचा वर्ग | दर | |
|---|---|---|---|
| | | क्षेत्र-एक | क्षेत्र-दोन |
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | रुपये | रुपये |
| | **कुशल** | | |
| १ | चकाकी व अंतिम उजाळा देणे .. .. | प्रतिदिन ९.०० | प्रतिदिन ८.०० |
| २ | बाह्यभाग सुबक कापणे आणि फुगीर करणे (कंगोरण). | | |
| ३ | समतलन .. .. .. .. | | |
| ४ | साचे काम यंत्रचालक .. .. | | |
| ५ | यांत्रिक (परिरक्षण) .. .. .. | | |
| ६ | हत्यारे चालक (कातारी, जोडारी, वीजतंत्री व सुतार). | | |
| ७ | संबंधित ज्ञान असलेला ड्रम ऑपरेटर. | | |
| | **टीप.**—वरील नोंदींमध्ये मोडणारे कुशल स्वरूपाचे काम करणारे व कोणत्याही नावाने ओळखले जाणारे कामगार. | | |
| | **अतिकुशल** | | |
| १ | साचा बनवणारा .. .. .. | प्रतिदिन ११.०० | प्रतिदिन १०.०० |
| २ | पर्यवेक्षक .. .. .. | | |
| १ | लिपिक–टंकलेखक .. .. .. | दरमहा २६०.०० अधिक (२६ दिवसांसाठी विशेष भत्ता) | दरमहा २३४.०० अधिक (२६ दिवसांसाठी विशेष भत्ता) |
| २ | लेखापाल .. .. .. | | |

५.२. **स्पष्टीकरण.**—या शिफारशींच्या प्रयोजनार्थ,

एक. (१) बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याच्या मर्यादित येणारे क्षेत्र, क्षेत्र-एक मध्ये समाविष्ट असेल ;

(२) क्षेत्र-एक मध्ये अंतर्भूत नसलेला बाकीचा सर्व महाराष्ट्र क्षेत्र-दोन मध्ये समाविष्ट असेल ;

**दोन.** उपरिनिर्दिष्ट किमान वेतनांच्या दरांव्यतिरिक्त अहवालाच्या परिच्छेद ४.३ मध्ये नमूद केलेल्या दरानुसार कामगारांना विशेष भत्ता मिळेल.

**तीन.** किशोरवयी व्यक्तीच्या बाबतीत, किमान वेतन दर, तो ज्या कामगार वर्गात मोडत असेल त्या वर्गाला निश्चित करून दिलेल्या वेतनांच्या ७५ टक्के असेल ;

**चार.** प्रशिक्षण घेणाऱ्याच्या बाबतीत, किमान वेतन दर, तो ज्या कामगार वर्गात मोडत असेल त्या वर्गाला निश्चित करून दिलेल्या वेतनांच्या ७५ टक्के असेल. अर्धकुशल आणि कुशल प्रकारातील प्रशिक्षणाचा कालावधी जास्तीत जास्त ६ (सहा) महिन्यांचा असेल ;

**पाच.** या किमान वेतन दरामध्ये आठवडयाच्या सुटीच्या दिवसाच्या पारिश्रमिकाचा समावेश असेल.

## आभार

अहवाल पूर्ण करण्यापूर्वी, चौकशीसंबंधित बाबींवर आपली मते सादर करून समितीच्या कामकाजामध्ये सहकार्य दिल्याबद्दल मालक आणि कामगार त्याचप्रमाणे त्यांचे संघ आणि संघटना यांचे समितीचा अध्यक्ष या नात्याने मी कृतज्ञतापूर्वक आभार मानत आहे.

तसेच, समितीने भेटी दिलेल्या चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या मुंबईतील सर्व कारखान्यांचे मालक आणि व्यवस्थापक यांच्याकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल समिती आभारी आहे.

मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींनी सलोख्याची भावना ठेवून एकजुटीने काम केले आणि एकमेकांची सोय बघण्याची, देवाण-घेवाणची वृत्ती दर्शवली त्यामुळे समितीला एकमताने आपल्या शिफारशी तयार करण्यास मदत झाली.

प्रारंभी सदस्य-सचिव म्हणून नियुक्त झालेले श्री. ए. एन. सक्सेना यांची देखील समिती मनःपूर्वक आभारी आहे.

कामगार आयुक्तांच्या कार्यालयातील कर्मचारी वर्ग आणि विशेषेकरून आकडेवारीविषयक माहिती गोळा करण्यासाठी ज्यांनी कारखान्यांना भेटी दिल्या ते या कार्यालयातील अन्वेषक व श्री. श्रीकांत जोशी, क. का. अन्वेषक इ. यांनी दिलेल्या सेवांबद्दल समिती त्यांची देखील कृतज्ञ आहे.

(सही)

**वाय. ए. रेशमवाला,**

अध्यक्ष.

| सदस्य : | सदस्य-सचिव : | सदस्य : |
|---|---|---|
| (सही) | (सही) | (सही) |
| (ए. सी. शेठ, मुंबई). | (आर. आर. करोसिया). | (एस. बी. जोशी, मुंबई). |
| सही) | | (सही) |
| (व्ही. आर. शाह, मुंबई). | | (अनाजी देसाई, मुंबई). |
| (सही) | | .(सही) |
| (अरविंद व्ही. मेहता, मुंबई). | | (शंकर बाबूराव कुर्ले, मुंबई). |

जोडपत्र 'क-एक'

## उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३० मे १९७७

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक एमडब्ल्यूए-६२७५-(८९६)-एलएबी-७.—किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरावा), कलम २७ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासनाच्या मते ज्या व्यवसायासंबंधीचे किमान वेतन दर निश्चित होणे आवश्यक आहेत तो खाली नमूद केलेला व्यवसाय १ सप्टेंबर १९७७ पासून उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग एक मध्ये समाविष्ट करण्याच्या आपल्या उद्देशाबाबतची नोटीस देत आहे :

"चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याचा व्यवसाय".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) झुल्फकार अलि,
कार्यासन अधिकारी.

---

जोडपत्र 'क-दोन'

## उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १ डिसेंबर १९७७.

**किमान वेतन अधिनियम, १९४८**

क्रमांक एमडब्ल्यूए-६२७५-८९६-एलएबी-७.—किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरावा), कलम २७ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे, ज्या व्यवसायाच्या बाबतीत उक्त अधिनियमानुसार किमान वेतन दर निश्चित करणे आवश्यक आहे तो खालील व्यवसाय, उक्त कलमान्वये आवश्यक असल्यामुळे तसे करण्याच्या आपल्या उद्देशाबाबतची नोटीस देऊन नंतर उक्त अधिनियमाच्या अनुसूचीच्या भाग एक मध्ये समाविष्ट करीत आहे :

५०. "चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याचा व्यवसाय".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानसार व नावाने,

(सही) श्रीमती के. ए. पेडणेकर,
शाखा अधिकारी.

## जोडपत्र 'क-तीन'

किमान वेतन अधिनियम, १९४८ अन्वये समितीची नियुक्ती.

### महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १५ मार्च १९७९.

**शासन निर्णय.**—महाराष्ट्र राज्यातील चष्म्यांच्या फ्रेम्स तयार करण्याच्या व्यवसायातील सद्य:स्थितीची चौकशी करण्यासाठी आणि उक्त व्यवसायातील किमान वेतन निश्चित करण्याच्या बाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र शासन, याद्वारे, किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरावा) च्या कलम ५, पोट-कलम (एक) व खंड (क) ला अनुसरून खाली दर्शविल्या-प्रमाणे एक समिती नियुक्त करीत आहे:

अध्यक्ष :
**श्री. वाय. ए. रेशमवाला,**
चालक, रिजन्ट ऑप्टिशियन्स,
१२-सी, पारशी बाजार मार्ग,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.

मालकांचे प्रतिनिधी

१. श्री. ए. सी. शेठ, अध्यक्ष, बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टिकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, नॅशनल इंडस्ट्रिज, कस्तुरबा रोड, मालाड, मुंबई-४०० ०६४.

२. श्री. अरविंद व्ही. मेहता, प्रमुख कार्यवाह, बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टिकल फ्रेम मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन आणि 'दि ऑल इंडिया स्पेक्टॅकल्स फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन,' चालक रॉयल ऑप्टिकल इंडस्ट्रिज, बी. नायगांव, दहावा मार्ग, वडाळा, मुंबई-४०० ०३१.

३. श्री. व्ही. आर. शाह, चालक, विर्को इंडस्ट्रिज, ६६, नाखोदा स्ट्रीट, मुंबई-४०० ००३.

कामगारांचे प्रतिनिधी

१. श्री. एस. बी. जोशी, प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र श्रमिक सभा, भवानी शंकर रोड, मुंबई-२८ (हिरामणी मार्केट, खो. क्र. २०९) डॉ. ए. बी. रोड, लालबाग, मुंबई-१२.

२. श्री. अनाजी देसाई, सदस्य, जनरल कौन्सिल, महाराष्ट्र श्रमिक सभा, द्वारा: मॉन्टेक्स कॉर्पोरेशन, राम मंदिर मार्ग, गोरेगांव (पश्चिम), मुंबई-४०० ०६२.

३. श्री. शंकर बाबूराव कुर्ले, सदस्य, जनरल कौन्सिल, महाराष्ट्र श्रमिक परिषद, द्वारा: पामेक्स इंडस्ट्रिज, सी-१८, सिंग इंडस्ट्रिअल इस्टेट, राम मंदिर मार्ग, गोरेगांव (पश्चिम), मुंबई-४०० ०६२.

२. श्री. ए. एन. सक्सेना, सहायक कामगार आयुक्त, मुंबई, यांची, त्यांच्या वैयक्तिक कर्तव्यां-खेरीज़, समितीचे सदस्य-सचिव म्हणून नेमणूक करण्यात यावी.

३. ह्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत समितीने शासनाला या-बाबतचा तपशीलवार अहवाल सादर करावा.

४. मुंबई नागरी सेवा नियम-खंड दोन-भाग एक-परिशिष्ट ४२-क मधील नियम एक (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रथम श्रेणीनुसार व शासन निर्णय, वित्त विभाग क्र. १०३२-सी/एसइआर-५, दिनांक २३ सप्टेंबर १९७७ अन्वये विधान मंडळाचे सदस्य नसलेल्या समितीच्या अशासकीय सदस्यांना समितीच्या कामासंबंधात केलेल्या प्रवासासाठी म्हणून प्रवासभत्ता व दैनिकभत्ता देण्यात येईल. समितीच्या स्थानिक सदस्यांना उक्त समितीच्या बैठकांसाठी दर दिवसासाठी म्हणून रु. ५.०० पर्यंत प्रत्यक्ष भाडेखर्च मिळेल.

५. समितीचे सदस्य-सचिव, श्री. ए. एन. सक्सेना हे समितीच्या अशासकिय सदस्यांचा प्रवास भत्ता आणि दैनिक भत्त्यांच्या बिलांच्या संदर्भात नियंत्रक अधिकारी असतील.

६. शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांनी आणि विभागांनी चौकशीच्या प्रयोजनार्थ समितीला आवश्यक असलेले सहाय्य द्यावे, अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

७. हा खर्च, "२८७-कामगार आणि सेवायोजन (अ) कामगार; (ब) औद्योगिक संबंध; (ब) चार" चौकशीसाठी विशेष समित्या "मागणी क्र. १३४", या अर्थसंकल्प शीर्षाखाली खर्चखाती टाकावा आणि त्याखाली मंजूर केलेल्या अनुदानातून तो भागवावा.

८. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे. त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७८-सीआर-७९-इएक्स.पी-१६, दिनांक २ मार्च १९७९ पहा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)

श्रीमती के. ए. पेडणेकर,

कार्यासन अधिकारी,

उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग.

प्रति :

अध्यक्ष आणि समितीचे सर्व सदस्य.

श्री. ए. एन. सक्सेना, सहायक कामगार आयुक्त.

कामगार आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

मुख्य निरीक्षक, कारखाने, मुंबई.

कामगार उपआयुक्त, ठाणे, नागपूर व औरंगाबाद.

अपर कामगार आयुक्त, पुणे.

शासकीय कामगार अधिकारी/सर्व सहायक कामगार आयुक्त/सर्व विभागीय आयुक्त.

महासंचालक, माहिती आणि जनसंपर्क, मुंबई.

उचित प्रसिद्धीपत्रक काढण्याच्या विनंतीसह :—

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

वित्त विभाग (इएक्सपी-१६).

मंत्रालयाचे इतर सर्व विभाग,

कामगार मंत्री यांचे खाजगी सचिव.

कामगार राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,

(आय.एन.डी-१७).

## जोडपत्र "क-चार"

किमान वेतन अधिनियम, १९४८.

चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या व्यवसायासाठी समितीची नियुक्ती.

### महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग

शासन निर्णय, क्रमांक एमडब्ल्यूए-६२८०-२८५९-एलएबी-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २५ सप्टेंबर १९८०.

**पहा.**—शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, दिनांक १५ मार्च १९७९.

कामगार आयुक्त, मुंबई, यांचे दिनांक १६ सप्टेंबर १९८० चे पत्र क्रमांक सीएल-एमडब्ल्यू ए-१२८०-ओ-एफ-एच. ओ.-८.

शासन निर्णय :

**शासन निर्णय.**—शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, दिनांक १५ मार्च १९७९ अन्वये चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या व्यवसायातील कामगारांचे किमान वेतन दर निश्चित करण्याच्या बाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीच्या सदस्य-सचिवपदी शासन, श्री. ए. एन. सक्सेना यांच्याऐवजी श्री. आर. आर. करोसिया, सहायक कामगार आयुक्त, मुंबई, यांची आपली स्वत:ची कर्तव्ये सांभाळून नियुक्ती करीत आहे.

२. समितीचे सदस्य-सचिव, श्री. आर. आर. करोसिया हे समितीचे अध्यक्ष व अशासकीय सदस्य यांच्या प्रवास भत्त्यांच्या संदर्भातील बिलांचे नियंत्रक अधिकारी असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) **श्रीमती के. ए. पेडणेकर,**
शासनाचे सहायक सचिव.

प्रति :

समितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य.
श्री. ए. एन. सक्सेना, कामगार सहायक आयुक्त, मुंबई.
श्री. आर. आर. करोसिया, कामगार सहायक आयुक्त, मुंबई.
कामगार आयुक्त, मुंबई.
मुख्य निरीक्षक, कारखाने, मुंबई.
कामगार उप-आयुक्त, ठाणे, पुणे व नागपूर.
अपर कामगार आयुक्त, पुणे व औरंगाबाद.
सर्व शासकीय कामगार अधिकारी.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
महासंचालक माहिती आणि जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

## जोडपत्र 'ख-एक'

किमान वेतन अधिनियम, १९४८. अन्वये समितीची नियुक्ती.

## महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२७९-२४४९-एल-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० डिसेंबर १९७९.

**पहा.**—(१) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, दिनांक १५ मार्च १९७९.

(२) कामगार सहायक आयुक्त आणि समितीचे सदस्य-सचिव यांचे दिनांक २२ नोव्हेंबर १९७९ चे पत्र क्रमांक सीएल-एमडब्ल्यूए-ओएफएफ-१०७९-एच. ओ. ८.

**शासन निर्णय.**—शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, यानुसार चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याच्या व्यवसायातील सद्यः स्थितीची चौकशी करण्यासाठी आणि उक्त व्यवसायात किमान वेतन दर निश्चित करण्याच्या बाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीला १४ मार्च १९८० पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने काढण्यात आलेला आहे. त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२०१-सीआर-७९-इएक्सपी-१६, दिनांक १४ डिसेंबर १९७९ पहा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) **श्रीमती के. ए. पेडणेकर,**

शासनाचे सहायक सचिव.

प्रति :

सभितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य.

श्री. ए. एन. सक्सेना, कामगार सहायक आयुक्त, मुंबई.

कामगार आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

कामगार आयुक्त, मुंबई.

मुख्य निरीक्षक, कारखाने, मुंबई.

कामगार उप-आयुक्त, ठाणे, नागपूर व औरंगाबाद.

अपर कामगार आयुक्त, पुणे.

सर्व शासकीय कामगार अधिकारी/सर्व सहायक कामगार आयुक्त.

सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.

महासंचालक, माहिती आणि जनसंपर्क मुंबई, उचित प्रसिद्धीपत्रक काढण्याच्या विनंतीसह.

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

अधिदान आणि लेखा कार्यालय, मुंबई.

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.

वित्त विभाग (इएक्सपी-१६) मंत्रालयातील इतर सर्व विभाग.

कामगार मंत्र्यांचे खाजगी सचिव.

कामगार राज्य मंत्र्यांचे खाजगी सहायक,

(आय. एन. डी. १७.)

## जोडपत्र "ख-दोन"

किमान वेतन अधिनियम, १९४८.
अन्वये समितीची नियुक्ति.

### महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२८०-२८१३-एलएबी-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑगस्ट १९८०.

पहा.—(१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-एलएबी-७, दिनांक १५ मार्च १९७९.

(२) कामगार सहायक आयुक्त आणि समितीचे सदस्य-सचिव यांचे दिनांक १२ ऑगस्ट १९८० चे पत्र क्रमांक सी.एल-एमडब्ल्यूए-ओएफएफ-१०८०-एचओ-८.

**शासन निर्णय.**—शासन निर्णय, उद्योग, उर्जा आणि कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८ १७५५ एलएबी-७, यानुसार चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याच्या व्यवसायातील सद्यःस्थितीची चौकशी करण्यासाठी आणि उक्त व्यवसायात किमान वेतन दर निश्चित करण्याच्या बाबतीत शासनाला सल्ला देण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीला दिनांक ३१ डिसेंबर १९८० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

ह्या शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे. त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७८५-सीआर-८०-इएक्सपी-१६, दिनांक २१ ऑगस्ट १९८० पहा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) श्रीमती के. ए. पेडणेकर,
शासनाचे सहायक सचिव.

प्रति :

समितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य.
श्री. ए. एन. सक्सेना, कामगार सहायक आयुक्त, मुंबई.
कामगार आयुक्त, मुंबई.
मुख्य निरीक्षक, कारखाने, मुंबई.
कामगार उप-आयुक्त, ठाणे, नागपूर व औरंगाबाद.
अपर कामगार आयुक्त, पुणे.
सर्व शासकीय कामगार अधिकारी/सर्व सहायक कामगार आयुक्त.
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
महासंचालक, माहिती आणि जनसंपर्क, मुंबई.
उचित प्रसिद्धीपत्रक काढण्याच्या विनंतीसह :
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
अधिदान आणि लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरीक्षक अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (इ एक्स पी-१६)/मंत्रालयातील इतर सर्व विभाग.
कामगार मंत्र्यांचे खाजगी सचिव.
कामगार राज्य मंत्र्यांचे खाजगी सहायक.
(आय. एन. डी-१७).

## जोडपत्र "ख-तीन"

किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या तरतुदीनुसार समितीची नियुक्ती.

### महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२८१-२९७९-का-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३ फेब्रुवारी १९८१.

पहा.—(१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ वेळोवेळी दुरुस्ती केल्याप्रमाणे.

(२) चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील उद्योगासंबंधी किमान वेतन अधिनियम, १९४८ खाली नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य सचिव व सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई, यांचे, दिनांक २३ डिसेंबर १९८० चे पत्र क्र. एमडब्ल्यूए-ओपीटी-समिती-१२८०-एओ-आठ.

शासन निर्णय.—महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील नोकरीच्या स्थितीचा अभ्यास करून त्या उद्योगासाठी किमान वेतनाचे दर निश्चित करण्याच्या प्रश्नावर शासनाला सल्ला देण्यासाठी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ नुसार नियुक्त करण्यात आलेल्या समितीला आपला अहवाल शासनाला सादर करण्यासाठी, दिनांक ३० जून १९८१ पर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय वित्त, विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १२-सीआर-८१-ईएक्सपी-१६, दिनांक १२ जानेवारी १९८१ द्वारा त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) श्रीमती के. ए. पेडणेकर,

शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रति :

समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य (पत्राने).
श्री. आर. आर. करोसिया, सहाय्यक कामगार आयुक्त व सदस्य सचिव, मुंबई.
कामगार आयुक्त, मुंबई.
अतिरिक्त कामगार आयुक्त, पुणे.
कामगार उप-आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व औरंगाबाद. मुख्य निरीक्षक, कारखाने मुंबई.
सर्व कामगार अधिकारी/सर्व विभागीय आयुक्त/महालेखापाल, महाराष्ट्र–१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र–२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी मुबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई, वित्त विभाग (इएक्सपी-१६).
सर्व मंत्रालयीन विभाग, कामगार मंत्री, राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
उद्योग-१७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

## जोड-पत्र "ख-चार"

### किमान वेतन अधिनियम १९४८ च्या तरतुदीनुसार समितीची नियुक्ती.

### महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२८१-४०९२-का-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १७ जुलै १९८१.

**पहा.**—(१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ वेळोवेळी दुरुस्ती केल्याप्रमाणे.

(२) चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील उद्योगासंबंधी किमान वेतन अधिनियम, १९४८ खाली नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य-सचिव व सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई, यांचे दिनांक ३० मे १९८१ चे पत्र क्र. एमडब्ल्यूए-ओपीटी-समिती-१२८१-ए-ओ-आठ.

**शासन निर्णय.**—महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील नोकरीच्या स्थितीचा अभ्यास करून त्या उद्योगासाठी किमान वेतनाचे दर निश्चित करण्याच्या प्रश्नावर शासनाला सल्ला देण्यासाठी शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ नुसार नियुक्त करण्यात आलेल्या समितीला आपला अहवाल शासनाला सादर करण्यासाठी, दिनांक ३० सप्टेंबर १९८१ पर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६७४-सीआर-८१-इएक्सपी-१६, दिनांक ३० जून १९८१ द्वारा त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने
(सही) श्रीमती के. ए. पेडणेकर,
शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रति :-

समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य (पत्राने).
श्री. आर. आर. करोसिया, सहाय्यक कामगार आयुक्त व सदस्य सचिव, मुंबई.
कामगार आयुक्त, मुंबई.
अतिरिक्त कामगार आयुक्त, पुणे.
कामगार उप-आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व औरंगाबाद. मुख्य निरीक्षक कारखाने, मुंबई.
सर्व कामगार अधिकारी/सर्व विभागीय आयुक्त. महालेखापाल, महाराष्ट्र—१, मुंबई.
महालेखापाल महाराष्ट्र—२ नागपूर, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई. निवासी लेखा. परीक्षा अधिकारी, मुंबई/वित्त विभाग (इएक्सपी-१६).
सर्व मंत्रालयीन विभाग, कामगार मंत्री, राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
उद्योग-१७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

## जोडपत्र "ख-पाच"

### किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या तरतुदीनुसार समितीची नियुक्ती—मुदतवाढ

### महाराष्ट्र शासन

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२८१-४२५८-का-७

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ७ ऑक्टोबर १९८१.

**पहा.**—(१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ वेळोवेळी दुरुस्ती केल्याप्रमाणे.

(२) चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील उद्योगासंबंधी किमान वेतन अधिनियम, १९४८ खाली नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य सचिव व सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई, यांचे, दिनांक ४ सप्टेंबर १९८१ चे पत्र क्र. सीएल-एमडब्ल्यूए-ओपीटी-समिती-१२८१-एओ-आठ.

**शासन निर्णय.**—महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील नोकरीच्या स्थितीचा अभ्यास करून त्या उद्योगासाठी किमान वेतनाचे दर निश्चित करण्याच्या प्रश्नावर शासनाला सल्ला देण्यासाठी शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ नुसार नियुक्त करण्यात आलेल्या समितीला आपला अहवाल शासनाला सादर करण्यासाठी, दिनांक ३१ डिसेंबर १९८१ पर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ९५३-सीआर-८१-इएक्सपी-१६, दिनांक १७ सप्टेंबर १९८१ द्वारा त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) **श्रीमती के. ए. पेडणेकर,**

शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रति :

समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य (पत्राने).
श्री. आर. आर. करोसिया, सहाय्यक कामगार आयुक्त व सदस्य सचिव, मुंबई.
कामगार आयुक्त, मुंबई.
अतिरिक्त कामगार आयुक्त, पुणे.
कामगार उप आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व औरंगाबाद. मुख्य निरीक्षक, कारखाने, मुंबई.
सर्व कामगार अधिकारी, सर्व विभागीय आयुक्त. महालेखापाल, महाराष्ट्र—१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र—२. नागपूर. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई. वित्त विभाग (इएक्सपी—१६)
सर्व मंत्रालयीन विभाग, कामगार मंत्री, राज्य मंत्री, यांचे स्वीय सहाय्यक.
उद्योग-१७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.

## जोडपत्र "ख-सहा"

किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या तरतुदीनुसार समितीची नियुक्ती–मुदतवाढ

महाराष्ट्र शासन

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

शासन निर्णय क्रमांक एमडब्ल्यूए-६२८१-४४८५-का-७

मंत्रालय, मुंबई–४०० ०३२, दिनांक २३ फेब्रुवारी १९८२.

**पहा**.—(१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. एमडब्ल्यूए-६२७८-१७५५ कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ वेळोवेळी दुरुस्ती केल्याप्रमाणे.

(२) चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील उद्योगासंबंधी किमान वेतन अधिनियम, १९४८ खाली नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य सचिव व सहाय्यक कामगार आयुक्त, मुंबई, यांचे दिनांक १६ डिसेंबर १९८१ चे पत्र क्र. एमडब्ल्यूए-ओपीटी-समिती-१२८१-मु. का.-आठ.

**शासन निर्णय**.—महाराष्ट्र राज्यातील चष्म्याच्या फ्रेम्स् बनविणाऱ्या आस्थापनातील नोकरीच्या स्थितीचा अभ्यास करून त्या उद्योगासाठी किमान वेतनाचे दर निश्चित करण्याच्या प्रश्नावर शासनाला सल्ला देण्यासाठी शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एमडब्ल्यूए-६२७८-१७५५-कामगार-७, दिनांक १५ मार्च १९७९ नुसार नियुक्त करण्यात आलेल्या समितीला आपला अहवाल शासनाला सादर करण्यासाठी, दिनांक ३१ मार्च १९८२ पर्यंत मुदत वाढवून देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७२-सीआर-८२ इएक्सपी-१६, दिनांक १२ फेब्रुवारी १९८२ द्वारा त्या विभागाच्या सहमतीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही) **श्रीमती के. ए. पेडणेकर,**

शासनाचे सहाय्यक सचिव.

**प्रति :**

समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य (पत्राने).
श्री. आर. आर. करोसिया, सहायक कामगार आयुक्त व सदस्य सचिव, मुंबई.
कामगार आयुक्त, मुंबई
अतिरिक्त कामगार आयुक्त, पुणे.
कामगार उप-आयुक्त, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर व औरंगाबाद. मुख्य निरीक्षक, कारखाने, मुंबई.
सर्व कामगार अधिकारी, सर्व विभागीय आयुक्त, महालेखापाल, महाराष्ट्र–१, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र–२, नागपूर, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई. वित्त विभाग (इएक्सपी–१६)
सर्व मंत्रालयीन विभाग, कामगार मंत्री, उपमंत्री, यांचे स्वीय सहाय्यक
उद्योग–१७, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
सर्व जिल्हाधिकारी.

# जोडपत्र "ग"

## चष्म्याच्या फ्रेम्स् तयार करणाऱ्या व्यवसायासाठी किमान वेतन समिती

### प्रश्नावली

(कारखान्याच्या मालकासाठी)

**सूचना:**—कृपया खाली दिलेल्या प्रत्येक बाबीची पूर्ण माहिती द्या.
(कृपया आपल्या कारखान्यास लागू नसलेल्या बाबी खोडा).

१. पूर्ण नाव व पत्ता ..............................................

२. पूर्ण पत्त्यासह मालक/भागीदार/व्यवस्थापन संचालक यांचे नाव ..............
..............................................................

३. पत्रव्यवहारासाठी टपालाचा पत्ता ..................................

४. दूरध्वनी क्रमांक (असल्यास) : ...............

५. कृपया मालकी हक्काच्या स्वरूपाचे निवेदन करा ..........................
(खाजगी मालकी/भागीदारी/सहकारी संस्था इ.)

६. सहकारी संस्था/मुंबई दुकाने आणि व्यापारी संस्था अधिनियम/कारखाने अधिनियम, याखाली आपल्या आस्थापनेची नोंदणी झालेली आहे काय, ते कृपया नमूद करा: ....

७.(अ) आस्थापनेतील कामाचा काही भाग कंत्राटदाराकडे सोपविलेला आहे काय? ....

(ब) जर, वरील 'अ' चे उत्तर "होय" असेल तर कंत्राटदाराचे नाव आणि
पत्ता: ..............................................................

८. (अ) मोल्डिंग प्रक्रियेने शीट किंवा धातू यांच्याद्वारे वा दोन्ही प्रक्रियांनी आपण चष्म्याच्या फ्रेम तयार करता काय?

(ब) व्यवसायामध्ये कामावर असलेल्या कामगारांची संख्या. ...............

| | पाळ्या | | | |
|---|---|---|---|---|
| | पहिली | दुसरी | तिसरी | एकूण |
| पुरुष : प्रौढ (१८ वर्षे किंवा त्याहून अधिक) | | | | |
| किशोरवयीन (१६ वर्षांच्या पुढे आणि १८ वर्षांच्याखाली) | | | | |
| मुले (१६ वर्षांखालील) | | | | |
| महिला : प्रौढ | | | | |
| किशोरवयीन | | | | |
| मुली | | | | |

कंत्राटदाराने कामावर ठेवलेले

पुरुष : प्रौढ

किशोरवयीन

मुले

महिला : प्रौढ

किशोरवयीन

मुली

९. कामगारांचे वर्गीकरण, वेतन व भत्ते यासंबंधीचा तपशील.

| अनुक्रमांक | कामगाराच्या वर्गाचे नाव | वर्गीकरण (कुशल, अर्ध-कुशल किंवा अकुशल) | व्यवसायातील कामगारांची संख्या | कामगाराचे वेतन | इतर भत्ते (कोणतेही असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

| दरमहा एकूण वित्तलब्धी [५ आणि (६) या रकान्यांची एकूण] | वेतन देण्याची पद्धती आणि कालावधी (उक्ता दर, समय दर, आठवड्याचे, महिन्याचे किंवा पंधरवड्याचे) | शेरे (असल्यास) |
|---|---|---|
| (७) | (८) | (९) |
| | | |

१०. वेतनश्रेणी आपण स्वत: निश्चित केलेली आहे की, समेटाने वा निवाड्याने निश्चित केलेली आहे? कृपया तपशील द्या.

११. (अ) जर, उक्ते दर देण्याची पद्धत असेल तर कृपया मालक आणि कंत्राटदार यांच्याकडून मिळत असलेल्या वेतनांचा तपशील द्या. कृपया स्वतंत्र पुरवणी जोडा.

(ब) जर, उक्ते दराची पध्दत प्रचलित असेल, तर कामाचे तास नियमित केलेले आहेत काय?

१२. अतिकालिक काम केले जाते काय? जर, असे असेल तर, त्याचा दर काय आहे?

१३. (अ) बोनस अधिनियमानुसार किंवा समेटानुसार आपणास कामगारांना बोनस द्यावा लागतो काय?

(ब) कृपया १९७६, १९७७ आणि १९७८ या वर्षांसाठी कोणत्या दराने बोनस देण्यात आला ते नमूद करा.

| १९७६ | १९७७ | १९७८ |
|---|---|---|

१४. कृपया खालील माहिती सादर करा :—

(अ) दुकाने अधिनियम/कारखाने अधिनियम यानुसार वार्षिक वैतनिगक/सवेतन रजा.

(ब) प्रतिवर्षी, रुग्णता रजा, असल्यास,

पूर्ण वेतनासह ............... दिवस.
अर्ध वेतनासह ................... दिवस.

(क) प्रतिवर्षी मिळणारी पूर्ण वैतनिक नमित्तिक रजा.

(ड) वर्षात दिल्या जाणाऱ्या सवेतन सुट्टया.

१५. आपण कामगारांना कल्याणविषेयक सुखसोयी पुरवता काय ?

जर, होय असेल तर, कृपया त्याचा तपशील द्या. जसे, कामाच्या वेळात चहा/दूध पुरवणे, व त्याचे प्रमाण उत्सव अग्रिम देणे, विवाह अग्रिम देणे, व्याजाशिवाय वैयक्तिक कर्ज देणे, वैद्यकीय सवलतींची तरतूद करणे, खेळ इत्यादी.

१६. १९७६, १९७७ आणि १९७८ या वर्षांची कृपया माहिती द्या :—

(सदर समितीच्या कामाखेरीज इतरत्र ही माहिती उपयोगात आणली जाणार नाही).

(अ) पैशाच्या रूपात वार्षिक आर्थिक उलाढाल (अ)...............
(ब) पैशाच्या रूपात वार्षिक निर्यात (ब)...............
(क) पैशाच्या रूपात वार्षिक विक्री (क)...............
(ड) कच्च्या मालाच्या साठ्याची स्थिती (ड)...............
(इ) तयार मालाची स्थिती (इ)...............

१७. आपल्या मते विविध वर्गातील कामगारांसाठी वेतनाचे किमान दर किती असावेत शक्य असल्यास, कारणे द्या. (स्वतंत्र पुरवणी जोडा).

(अ) वेतन एकत्रित करण्याचा आपला प्रस्ताव आहे काय ?

(ब) की, मूळ किमान वेतन दर आणि राहणी खर्च निर्देशांकाशी जोडलेला विशेष भत्ता देण्याच्या पद्धतीचा आपला प्रस्ताव आहे ?

१८. उक्त्या दरांचो समितीने शिफारस करावी, असे आपणास सुचवावयाचे आहे काय ?

१९. किमान वेतन देण्यासाठी आपण सुचविलेल्या कामगारांच्या विविध प्रवर्गाच्या कामांची प्रमाणके आपण सुचवू शकाल काय ?
कृपया तपशील द्या.

२०. ह्या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनांच्या किमान दरांची समिती शिफारस करण्यापूर्वी, ह्या समितीने ज्या गोष्टी विचारात घ्याव्यात असे आपणास वाटते त्याबाबतची तपशीलवार माहिती आपण द्यावी.

स्थळ : ............................ (सही) ............................

दिनांक : ............................ पदनाम ............................

## कामगारांचे वर्गीकरण, वेतन व सर्व भत्ते यांचा तपशील

| अनुक्रमांक | प्रवर्गाचे नाव | वर्गीकरण (कुशल/अर्धकुशल/ अकुशल) | कामगारांची संख्या | वेतन | अन्य भत्ते | एकूण | वेतन देण्याची पद्धती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | .पैसे | रु. पैसे | रु. पैसे | | |

# जोडपत्र "घ"

## कारखान्यांची सूची

### ज्यांनी तपशीलवार माहिती पुरवलेली आहे अशा ३८ आस्थापनांची सूची

| अनु-क्रमांक | आस्थापनेचे नाव | कामगारांची एकूण संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मॉनेटेक्स कार्पोरेशन, मुंबई–४०० ०६२ .. .. .. | १३० |
| २ | मे. मेघदूत प्लॅस्टिक कार्पोरेशन, मुंबई–४०० ०६७ .. .. | १० |
| ३ | श्री. राणी सती प्लॅस्टिक इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६३ .. .. | १४ |
| ४ | झेनिथ ऑप्टिकल इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०११ .. .. | ५ |
| ५ | श्री. महावीर ऑप्टिकल इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६२ .. .. | २० |
| ६ | गंगा प्लॅस्टिक इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | ३ |
| ७ | गोल्डन प्लॅस्टिक मशिनरी कार्पोरेशन, मुंबई–४०० ०४४ .. .. | ८ |
| ८ | अशोक प्लॅस्टिक इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | ७ |
| ९ | जागानी ब्रदर्स, मुंबई–४०० ०६४ .. .. .. .. | १० |
| १० | मेट्रो ऑप्टिकल सर्व्हिसेस, मुंबई–४०० ०६३ .. .. .. | १४ |
| ११ | मे. अनिल ब्रदर्स, मुंबई–४०० ०६० .. .. .. .. | ४ |
| १२ | विर्को इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६७ .. .. .. .. | ४२ |
| १३ | एस. एम. के. इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६७ .. .. .. | २६ |
| १४ | राजन प्लॅस्टिक इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | १० |
| १५ | दूर ऑप्टिकल वर्क्स, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | १० |
| १६ | पुष्पम् प्लॅस्टिक इंडस्ट्रि, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | ७ |
| १७ | यू. के. ऑप्टिकल कंपनी, मुंबई–४०० ०१६ .. .. .. | २० |
| १८ | जवाहर ऑप्टिकल इंडस्ट्रिज, मुंबई–४०० ०६४ .. .. | ८ |

जोडपत्र "घ"—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १९ | जयंतीलाल मोहनलाल, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | १ |
| २० | न्यू स्टाईल ऑप्टिकल इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. .. | ७ |
| २१ | जयंतीलाल नारायणदास अँण्ड कंपनी, मुंबई–४०० ०७० .. .. | ४५ |
| २२ | स्पेक्ट्रम कार्पोरेशन, मुंबई–४०० ०७० .. .. .. | ३४ |
| २३ | ज्योति अँड दिलीप प्लॉस्टिक इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. .. | ६ |
| २४ | साईनाथ ऑप्टिकल इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. .. | ८ |
| २५ | भट्टी अँन्ड सन्स, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | ५ |
| २६ | मे. स्पेक्ट क्रॅफ्टस्, मुंबई–४०० ०६४ .. .. .. .. | २८ |
| २७ | अजंठा इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. .. .. .. | ६ |
| २८ | मे. राजकमल ऑप्टिकल इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. | ६ |
| २९ | ब्यूटी प्लॅस्टिक्स्, मुंबई–४०० ०६४ .. .. .. .. | २ |
| ३० | चालक, अश्विन प्लॉस्टिक इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६३ .. .. | ५ |
| ३१ | सुरेश ऑप्टिकल इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६८ .. .. .. | ८ |
| ३२ | माधव इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६८ .. .. .. .. | १३ |
| ३३ | जॉली ऑप्टिकल्स्, मुंबई–४०० ०६८ .. .. .. | ९ |
| ३४ | राजेन्स ऑप्टिकल इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. .. .. | ८ |
| ३५ | विनोद इंडस्ट्रीज, मुंबई–४०० ०६४ .. .. .. .. | ९ |
| ३६ | आर्ट बँगल प्रा. लिमिटेड, मुंबई–४०० ०६७ .. .. .. | २८ |
| ३७ | विपूल ट्रेडर्स, मुंबई–४०० ०६३ .. .. .. .. | ७ |
| ३८ | चालक, कटारिया ऑप्टिकल फॅक्टरी, मुंबई–४०० ०११ .. .. | ३० |

जोडपत्र

## कामगारांचे विद्यमान किमान/कमाल

| अनुक्रमांक | आस्थापनाचे नाव | कामगारांची एकूण संख्या | अतिकुशल | | | कुशल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कामगारांची संख्या | किमान | कमाल | कामगारांची संख्या | किमान | कमाल |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | रुपये | रुपये | | रुपये | रुपये |
| १ | कटारिया ऑप्टिकल | ३० | .. | .. | .. | ११ | १०.०० | २३.२५ |
| २ | मॉन्टेक्स कार्पोरेशन | १३० | ९ | २६.९२ | ५३.८४ | २० | १६.०० | २२.९० |
| ३ | मेघदूत प्लॅस्टिक | १० | .. | .. | .. | १ | २२.५० | .. |
| ४ | श्री राणी सती | १४ | .. | .. | .. | ११ | ७.५० | १३.०० |
| ५ | झेनिथ ऑप्टिकल | ५ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ६ | श्री महावीर ऑप्टिकल | २० | .. | .. | .. | १२ | १०.६७ | १२.९७ |
| ७ | गंगा प्लॅस्टिक | ३ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ८ | गोल्डन प्लॅस्टिक | ८ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ९ | अशोक प्लॅस्टिक | ७ | .. | .. | .. | २ | ६.०६ | ७.५६ |
| १० | जागानी ब्रदर्स | १० | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ११ | मेट्रो ऑप्टिकल | १४ | .. | .. | .. | ८ | ८.२५ | १३.०० |
| १२ | अनिल ब्रदर्स | ४ | .. | .. | .. | ४ | ११.०० | ११.५४ |
| १३ | विर्को इंडस्ट्रिज | ४२ | ३ | १६.३४ | २१.८५ | २ | १४.२५ | १९.५० |
| १४ | एस. एम. आर. इंडस्ट्रिज | २६ | २ | १४.४२ | १७.३० | ३ | १३.०० | २५.०० |
| १५ | राजेन प्लॅस्टिक | ११ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| १६ | दीन ऑप्टिकल | १० | .. | .. | .. | २ | १०.७० | १०.७० |
| १७ | पुष्पम् प्लॅस्टिक | ७ | .. | .. | .. | २ | १३.०० | १५.०० |
| १८ | यू. के. ऑप्टिकल | २० | .. | .. | .. | ३ | १४.५० | २४.२३ |
| १९ | जवाहर ऑप्टिकल | ८ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| २० | जयंतीलाल मोहनलाल | १ | .. | .. | .. | १ | १०.५० | . |

" घ-एक "

## वेतन दर्शविणारे विवरणपत्र

| अर्धकुशल | | | अकुशल | | | कारकून वर्ग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कामगारांची संख्या | किमान | कमाल | कामगारांची संख्या | किमान | कमाल | कामगारांची संख्या | किमान | कमाल |
| (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) |
| | रुपये | रुपये | | रुपये | रुपये | | रुपये | रुपये |
| १६ | ५.५० | ११.५० | ३ | ५.५० | ५.५० | .. | .. | .. |
| ९१ | ७.०५ | १९.९५ | ५ | ८.५५ | १५.१७ | ५ | ११.५४ | ३०.७६ |
| ७ | १०.०० | ११.०० | २ | ८.५० | ८.५० | .. | .. | .. |
| १ | ७.०० | .. | २ | ५.०० | ५.०० | .. | .. | .. |
| ४ | १२.५० | १५.०४ | १ | ९.०६ | .. | .. | .. | .. |
| ७ | ८.५२ | १२.४७ | १ | ९.३७ | .. | .. | .. | .. |
| २ | १०.०० | १०.०० | १ | ८.०० | .. | .. | .. | .. |
| ८ | ९.०० | ९.५० | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ३ | ५.२० | ५.३५ | २ | ४.७२ | ५.०६ | .. | .. | .. |
| १० | ९.०० | १०.०० | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ४ | ८.०० | १०.०० | २ | ८.०० | .. | .. | .. | .. |
| .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ३१ | ५.०० | ११.५० | ४ | ५.५० | ५.५० | २ | ८.०० | १६.३४ |
| १७ | ६.०० | ११.५० | ४ | ५.०० | ७.०० | .. | .. | .. |
| ११ | ६.०० | ११.०० | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ७ | ८.९५ | ९.७० | १ | ८.२० | .. | .. | .. | .. |
| ४ | १०.०० | १०.०० | १ | १०.०० | .. | .. | .. | .. |
| १३ | ७.१० | ११.१२ | ३ | ४.३७ | ७.७७ | १ | ९.६१ | .. |
| ८ | ९.५० | १०.५० | .. | .. | .. | . | | |
| .. | .. | .. | .. | .. | .. | . | | |

जोडपत्र

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | न्यू स्टाईल ऑप्टिकल | ७ | .. | .. | .. | १ | १९.२३ | .. |
| २२ | जयंतीलाल .. | ४५ | ५ | १५.६५ | २०.६५ | १७ | ९.७० | १४.५० |
| २३ | स्पेक्ट्रम ऑप्टिकल | ३४ | १ | ३५.१९ | .. | ४ | १४.५० | १७.०० |
| २४ | दिलीप प्लॅस्टिक | ६ | .. | .. | .. | ३ | ९.०० | १०.०० |
| २५ | साईनाथ ऑप्टिकल | ८ | .. | .. | .. | ३ | १२.०० | १३.५० |
| २६ | भट्टी अँड सन्स | ५ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| २७ | स्पेक्ट क्रॅफ्टस् | २८ | .. | .. | .. | ३ | २६.९२ | ४६.१५ |
| २८ | अजंठा इंडस्ट्रिज | ९ | .. | .. | .. | ६ | ७.०० | ८.५० |
| २९ | राजकमल ऑप्टिकल | ६ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ३० | ब्यूटी प्लॅस्टिक | २ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ३१ | अश्विन प्लॅस्टिक | ५ | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ३२ | सुरेश ऑप्टिकल | ८ | .. | .. | .. | ६ | ९.२३ | १५.०२ |
| ३३ | माधव इंडस्ट्रिज | १३ | .. | .. | .. | १२ | १०.०० | १४.०० |
| ३४ | जॉली ऑप्टिकल्स् | ९ | .. | .. | .. | ९ | १०.०० | १४.०० |
| ३५ | राजेंन्स ऑप्टिकल | ८ | .. | .. | .. | ७ | १०.०० | १९.६१ |
| ३६ | विनोद इंडस्ट्रिज | ९ | .. | .. | .. | ९ | ७.०० | १३.०० |
| ३७ | आर्ट बँगल प्रायव्हेट, लिमिटेड. | २८ | २ | ३५.५७ | ३५.५७ | २४ | २२.१९ | २६.९२ |
| ३८ | विपूल ट्रेडर्स | ७ | .. | .. | .. | ४ | १२.०० | १८.०० |
| | एकूण .. | ६१४ | २२ | .. | .. | १९० | .. | .. |

"घ-एफ"—चालू

| (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ११.०० | १२.५० | १ | ६.०० | .. | .. | .. | . |
| ८ | ८.२० | १२.७० | ५ | ४.९० | ६.९० | १० | ९.०४ | [illegible] |
| ९ | ८.०० | ११.०० | १९ | ६.०० | ८.०० | १ | २४.८१ | . |
| .. | .. | .. | ३ | ७.०० | ७.०० | .. | .. | .. |
| ४ | १०.०० | ११.०० | १ | ५.५० | .. | .. | .. | .. |
| ४ | १०.०० | १२.०० | १ | १०.०० | .. | .. | .. | .. |
| १४ | ७.२५ | १७.०५ | ११ | ७.५० | १०.५० | .. | .. | .. |
| .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| ६ | ८.०० | १२.०० | .. | .. | .. | .. | .. | .. |
| १ | ८.०० | .. | १ | ७.०० | .. | .. | .. | .. |
| ३ | ८.०० | १२.०० | २ | ६.०० | ६.०० | .. | .. | .. |
| २ | १०.०० | १०.०० | .. | .. | .. | .. | .. | .. |
| .. | .. | .. | .. | .. | .. | १ | २१.१५ | .. |
| .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| .. | .. | .. | १ | ९.२३ | .. | .. | .. | .. |
| .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| .. | .. | .. | २ | १८.९२ | २०.५३ | .. | .. | .. |
| २ | १०.०० | ११.०० | १ | ७.०० | .. | .. | .. | .. |
| ३०२ | .. | .. | ८० | .. | .. | २० | .. | .. |

## जोडपत्र 'ङ'

### १६ जानेवारी १९८१ रोजी किमान वेतन समितीने कारखान्यांना दिलेल्या भेटीबाबतचे श्री. ए. सी. शेठ यांचे विचार

किमान वेतन समितीच्या खाली नमूद केलेल्या सदस्यांनी शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी १९८१. रोजी चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याच्या उद्योगातील काही कारखान्यांना प्रत्यक्ष भेट दिली :—

(१) श्री. ए. सी. शेठ

(२) श्री. एस. बी. जोशी

(३) श्री. अनाजी देसाई

(४) श्री. एस. बी. कुर्ले

(५) श्री. आर. आर. करोसिया (सदस्य-सचिव)

समितीने भेट दिलेले कारखाने पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) चालक, मॉन्टेक्स कॉर्पोरेशन, गोरेगाव.

(२) चालक, राजकमल प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, मलाड.

(३) चालक, मेजर ड्राय वर्क्स, मालाड.

(४) चालक, महावीर ऑप्टिकल इंडस्ट्रीज, गोरेगाव.

(५) चालक, पामेक्स इंडस्ट्रीज गोरेगाव आणि

(६) चालक, मेट्रो ऑप्टिकल सर्व्हिसेस, गोरेगाव.

समितीने अभ्यासलेल्या कारखान्यांच्या संदर्भातील काही ठळक व समर्पक मुद्द्यांवरील माझे विचार मी संक्षिप्तपणे पुढे देत आहे.

१. मे. मॉन्टेक्स कॉर्पोरेशन, राम मंदिर रोड, गोरेगाव.—हा कारखाना भारतातील मोठ्या व अग्रेसर उत्पादकांपैकी एक असून अनेक बाबतीत तो अनन्य साधारण आहे. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या उद्योगातील कारखाने कसे असावेत याचा तो एक आदर्श होऊ शकेल ; परंतु, दुर्दैवाने ते कारखाने तसे नाहीत हे अन्य कारखान्यांना दिलेल्या भेटींमधून समितीच्या सदस्यांच्या लक्षात आले आहे.

या कारखान्याचे क्षेत्र सुमारे ३५,००० चौ. फूट इतके आहे. त्यात पर्यवेक्षक आणि कर्मचारी वर्ग यांच्यसह अदमासे १५० कामगार नोकरी करतात. या कारखान्यामध्ये उत्कृष्ट दर्जाचे प्लॅस्टिक शीट आणि धातुच्या फ्रेम तयार होत त. आंतरराष्ट्रीय मानकानुसार असलेल्या अद्यावत् विदेशी यंत्रसमुग्रीने हा कारखाना सुसज्ज आहे आणि देशी बाजारपेठेत त्यांच्या उत्पादनाची भरपूर विक्री होत असली तरीही त्यांचे उत्पादन प्रामुख्याने विदेशी बाजारपेठेला पुरविले जाते.

या कारखान्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करण्यात आलेली असून मुंबईतील अन्य कोणत्याही कारखान्यांमध्ये तेवढी गुंतवणूक करण्यात आलेली नाही. कितीही मोठी कल्पना केली तरी ज्या प्रमाणावर येथे गुंतवणूक करण्यात आलेली आहे त्या गुंतवणुकीशी या उद्योगातील

सर्वसामान्य कारखान्यामधील गुंतवणुकींची तुलना होणे शक्य नाही आणि या कारखान्याने स्वत:चा असा एक स्वतंत्र वर्ग निर्माण केला असून तो कदापिही साधारणपणे सर्वसामान्य वर्गात मोडणाऱ्या या उद्योगातील कारखान्यांचा प्रतिनिधी होऊ शकणार नाही या साध्या कारणास्तव त्या कारखान्यातील वेतन दरांची त्याच उद्योगातील अन्य कारखान्यातील वेतनदरांशी तुलना करणे निरर्थक आहे असे असल्यामुळे तो या उद्योगातील वेतन संरचनेबाबतची कोणतीही कल्पना देऊ शकत नाही किंवा त्याच्यापासून कसलाही धागा सापडत नाही. त्यामुळे, या विशिष्ट कारखान्यावरील आणखी चर्चेमुळे या संपूर्ण उद्योगातील कारखान्यांमध्ये दिल्या जाणाऱ्या वेतनाशी काहीही संबंध येत नाही.

२. **मे. राजकमल प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, मालाड.**—साच्यांच्या आधारे चष्म्याच्या प्लॅस्टीकच्या फ्रेम्स तयार करणारी ही खाजगी मालकीची संस्था आहे. तिचे कामकाज भाड्याने घेतलेल्या एका जागेत चालते आणि ही जागा अदमासे ३०० चौरस फूट आहे. ही जागा एका जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये आहे. यामधील यंत्रसामुग्रीसाठी केलेला खर्च अदमासे रु. १०,००० इतका आहे. जरी १९५१ साली या कारखान्याची स्थापना झालेली असली तरी ह्या कारखान्यामध्ये कसलेही फर्निचर नाही किंवा कोणत्याही नाव घेण्याजोग्या पक्क्या बसविलेल्या वस्तू नाहीत. या कारखान्याचा मालकच स्वत: लाकडी स्टुलावर बसतो. ह्या वस्तुस्थितीवरून त्याची कल्पना येईल.- हा खरे तर पती-पत्नी दोघांनी मिळून चालवलेला कुटिर उद्योगच आहे आणि ते दोघेही अत्यंत कष्टाळू आहेत. त्यांच्याकडे साधारणपणे ६ ते ७ कामगार कामाला आहेत. ५ अश्वशक्तीच्या मोटारवर हा कारखाना चालतो.

अकुशल कामगारांचे सरासरी दैनंदिन वेतन रु. ५ ते ६ इतके आहे तर तथाकथित अर्धकुशल कामगाराचे रु. ६ ते ९ इतके आहे आणि कुशल कामगारांना दिले जाणारे कमाल वेतन रु. ११.५० इतके आहे. आपला तयार माल डझनाला रु. १८ ते २० इतक्या कमी किंमतीला विकला जात असल्यामुळे खर्चाची तोंडमिळवणी करणे जेमतेम शक्य होते ही उघड उघड वस्तुस्थिती त्याने लपवून ठेवली नाही.

३. **मे. मेजर डाय वर्क्स, मालाड.**—या कारखान्यामध्ये केवळ धातूच्या फ्रेम्स तायार केल्या जातात. तीन भागीदार मिळून भागीदारीमध्ये हा कारखाना चालवत आहेत. फक्त २०० चौरस फुटाच्या म्हणजेच मध्यमवर्गीय व्यक्तीच्या घरापेक्षाही भाड्याने घेतलेल्या लहान अशा जागेमध्ये तयार यंत्रसामुग्री विकत घेण्याची चैन परवड नसल्यामुळे त्या भागीदारांपैकी एकाने कारखाना चालवण्यासाठी किमान आवश्यक असलेले डाईज, जिग्ज व फिक्स्चर्स (Dies, Jigs and Fixtures) स्वत:च तयार केलेले आहेत. सर्वदृष्टीने पाहता या कारखान्यामधील गुंतवणूक ही रु. १०,००० पेक्षा अधिक नाही. आपण फक्त आपला चरितार्थ चालवु शकतो यापेक्षा अधिक काहीही नाही, असे भागीदारांनी प्रामाणिकपणे मान्य केलेले आहे. कारखान्यातील 'कुशल' आणि 'अतिकुशल' कामगार ते स्वत:च आहेत. नवीन कामगाराला रु. ५ ते ६ यापेक्षा अधिक दैनंदिन वेतन आणि अधिक अनुभवी कामगारांना रु. ७ ते ९ यापेक्षा अधिक दैनंदिन वेतन देणे त्यांना परवडत नाही, यात काहीच आश्चर्य करण्यासारखे नाही. त्यांच्याकडे एकूण केवळ ६ कामगार कामाला आहेत आणि त्या कामगारांपैकी फक्त एकजण रु. १४ इतके वेतन प्रतिदिन मिळवितो. कारखान्यात दिले जाणारे हे सर्वात जास्त वेतन असून तेही या एकमेव कामगारालाच दिले जाते.

४. **मे. महावीर ऑप्टिकल, इंडस्ट्रीज, गोरेगाव.**—या उद्योगातील अगदी सुरुवातीच्या कारखान्यांमधील हा एक आहे ; आणि या प्रांतात दशकांचा काळ घालवनही अद्यापि ते केवळ १,००० चौरस फुटांच्या भाड्याने घेतलेल्या जागेतच फक्त दहा अश्वशक्तींच्या मोटारीवर कारखाना चालवतात. तेथे ३ पर्यवेक्षीय आणि सुरक्षा कर्मचारी मिळू एकूण १४ कामगार आहेत. त्यांच्या तयार मालाची विक्रीची किमत रु. २७ ते ४२ डझन इतकी आहे. तसेच, श्री. एस. बी. जोशी प्रमुख असलेल्या कामगार संघटनेबरोबर या कारखान्याने एक करार देखील केलेला आहे. त्या करारानुसार कामगारांच्या वरिष्ठतेनुसार रु. १० ते १५ आणि रु. २·५० एवढा विशेष गणवेश भत्ता इतके दैनंदिन वेतन निश्चित करण्यात आलेले आहे. या करारामध्ये वेतनांचा संबंध उत्पादनाशी जोडलेला आहे. परंतु, भागीदारांच्या मतानुसार आवश्यक त्या पातळी-पर्यंत उत्पादन कधी वाढलेच नाही. बफिंगचे काम करणारे कामगार ते कुशल कामगार आणि स्क्रॅपिंग, फिटिंग व लेव्हलींगची यांसारखी कामे करणारे कामगार ते अर्धकुशल कामगार अशा प्रकारे कामगारांचे स्वतंत्रपणे वर्गीकरण करण्याचा देखील कराराने प्रयत्न केला आहे. जेव्हा या कारखान्याच्या आर्थिक स्थितीविषयी विचारण्यात आले तेव्हा भागीदारांनी आम्हास सांगितले की, ते हा घटक चालवित आहेत त्याचे कारण एवढेच की, ते या प्रांतात दीर्घ काळापासून आहेत, आणि त्यांना परिचित असलेला हाच एकमेव उद्योग आहे अन्यथा फार पूर्वीच त्यांनी हा धंदा बंद केला असता.

५. **मे. पामेवल ऑप्टिकल इंडस्ट्रीज, गोरेगाव.**—ज्याच्याद्वारे प्लॅस्टिक फ्रेम्स तयार करणारी ही एक भागीदारी संस्था आहे. १,२०० चौरस फूट इतक्या जागेमध्ये हा कारखाना असून तेथे २७ कामगार कामाला आहेत व १० अश्वशक्तीं असलेल्या यंत्रसामग्रीवर त्यांचे काम चालते. श्री. एस. बी. जोशी यांचे नेतृत्व असलेल्या संघटनेशी ह्या कारखान्याचा करार झालेला असून त्यामध्ये उत्पादनाशी वेतनाचा संबंध जोडलेला आहे. परंतु, येथेही प्रत्यक्ष उत्पादन नेहमीच संकल्पित लक्ष्या-पेक्षा कमी असते. अर्धकुशल कामगारांसाठी कोणताही विशेष भत्ता ठरविलेला नाही; आणि त्यांना मिळणाऱ्या दैनिक वेतनाची किमान मर्यादा रु. ८·६० व कमाल मर्यादा रु. १६.७० इतकी सर्वसाधारणपणे असून रु. ९ ते १२ या दरम्यान त्यांना दैनिक वेतन मिळते. त्यांच्यापैकी केवळ एकाच कामगाराला रु. १६·७० इतके दैनिक वेतन मिळते. तेथील यंत्रसामुग्रीमध्ये केलेली गुंतवणुक सुमारे रु. ३०,००० इतकी असून तेथे जवळजवळ रु. ७०,००० चे खेळते भांडवल आहे. भागीदारांपैकी एकाच्या मते तुलनात्मक दृष्टीने पाहता यामध्ये केलेल्या रु. १,००,००० च्या मोठ्या गुंतवणुकीच्या मानाने कारखान्यापासून होणारी प्राप्ती ही निराशाजनक आहे.

६. **मे. मेट्रो ऑप्टिकल सर्व्हिसेस, गोरेगाव.**—या उद्योगातील जुन्या कारखान्यांपैकी हा एक कारखाना असून तो भागीदारीमध्ये चालविण्यात येतो. यामधील यंत्रसामुग्रीसाठी केलेली गुंतवणूक रु. ३०,००० इतकी आहे व त्यांची प्रेरक शक्ती १० अश्वशक्ती इतकी आहे. जुना असून देखील हा कारखाना अद्यापी १,००० चौरस फूटाच्या भाड्याच्या जागेतच असून उत्पादन कक्ष, भांडार कक्ष इत्यादी सर्व तेवढ्याच जागेत समाविष्ट आहेत. भागीदाराच्या मते त्यांचे सर्व कामगार अकुशल प्रवर्गात मोडतात. कोणत्याही नवशिक्या माणसाला कोणतेही काम जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या अवधिमध्ये तो शिकवू शकतो असे त्याने खात्रीपूर्वक सांगितले आहे. समितीच्या सदस्यांपुढे प्रात्याक्षिक करून दाखवण्यासाठी त्याने चष्म्याच्या फ्रेम्सच्या कडा वळ-विणाऱ्या कामगाराकडे लक्ष वेधले आणि ही साधी क्रिया स्वतःच्या हाताने करावी, अशी श्री. करोसिया यांना विनंती केली. सर्व समिती-सदस्यांना आश्चर्यात टाकणारी गोष्ट म्हणजे,

चष्म्याच्या फ्रेम्स तयार करणाऱ्या कारखान्यामधील कामाचे अगदी कोणतेही पूर्वज्ञान नसताना श्री. करोसिया पहिल्याच प्रयत्नात सहजपणे ते काम करू शकले. ही गोष्ट आपल्या कारखान्यातील सर्व कामे 'अकुशल' वर्गात मोडतात ह्या आपल्या ठाम विधानाशी समर्थक आहे असे भागीदाराने प्रतिपादन केले. कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतनांविषयी बोलताना तो भागीदार म्हणाला की, कामगारांच्या वरिष्ठतेनुसार त्यांना रु. ८, ९ आणि ११ इतके दैनंदिन वेतन दिले जाते आणि सर्वात ज़ास्त दिले जाणारे वेतन रु. १४ इतके आहे. स्वत: भागीदार कोणत्याही प्रकारचे शारीरिक काम करण्यास कधीच मार्गे पुढे पाहात नाहीत, असे असून देखील त्यांना हा कारखाना कसाबसा चालू ठेवणेच जेमतेम शक्य होते, अशी त्याने तक्रार केली.

समितीने भेट दिलेल्या कारखान्यांवरील ही माझी संक्षिप्त मते आहेत. वर नमूद केलेल्या वस्तुस्थितीमधून व्यक्त झालेली सदर उद्योगाची हलाखीची परिस्थिती इतकी बोलकी आहे की, त्यावर आणखी काही भाष्य करण्याची आवश्यकता नाही. व्यक्तीश: समितीच्या सदस्यांनी जे पाहिले त्यावरून ते त्यांचे स्वत:चे निष्कर्ष काढू शकतात. कारखान्यांसंबंधात नोंद घेतलेली वस्तुस्थिती समितीला अगोदरच सादर केलेल्या श्री. ए. व्ही. मेहता व श्री. व्ही. आर. शाह यांच्या सह्या असलेल्या निवेदनातील म्हणण्याला पुरेपूर पुष्टी देते.

ही टिप्पणी कृपया समितीच्या सर्व सदस्यांच्या माहितीकरिता फिरविण्यात यावी म्हणजे मग समिती जेव्हा आपले कार्यवृत्त तयार करील व अहवालाला अंतिम स्वरूप देईल तेव्हा त्या सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची योग्य दखल घेता येईल.

(सही) ए. सी. शेठ,
समिती-सदस्य.

## जोडपत्र 'च'

खाली नमूद केलेली वर्गवारी ही ज्या ३८ आस्थापनांनी तपशीलवार माहिती पाठवली त्यामधून घेतलेली आहे.

| वर्ग | वेतन | |
|---|---|---|
| | किमान | कमाल |
| कुशल.—वफ, संकीर्ण (सर्व प्रकारचे काम करणारा) चाकू, लोघ, सूचिवेध, छपाईगार, सोन्याचा तुकडा कापण्याचा विभाग, कंगोरण विभाग, भरण विभाग, कोपरा भरण, अंतिम तपासणी, साचा तयार करणे, सुतार, कायदेशक, वफर, जोडणीकामे, साचेकार, दगडाची-भूकटी, बफर, खरवडणारा, जोडारी, एकेरी वफर, दुहेरी बफर, पॉलीश करणारा, पर्यवेक्षक, जोडारी, टॅनर, तार-यांत्रिक, व्यवस्थापक, फ्रेम-समायोजक, कटाई, गाळणी (सर्व प्रकारचे काम करणारी), मिस्त्री, आवेधक, लेखापाल, कातारी. | प्रतिदिन रु. ६.०० लिपिक रु. ६४५ | प्रतिदिन रु. ४६.१५ |
| अर्धकुशल.—जोडणीकाम, साधने, वफ, आवेष्टन, पहारेकरी, तुकडा कापण्याचा विभाग, कंगोरण विभाग, भरण विभाग, पुष्टिपत्र-चिकटविणे, वाकवणे, क्रुमरुम, चकाकी देणे, कोपरा-भरण, परिरक्षा, यंत्र-चालक, आणि साधारण काम, झाळकाम, कातारी, तपासणीस भांडार पाल, जोडारी, एकेरी बफर, दुहेरी बफर, यंत्र-चालक, जुळारी, टंकलेखक, प्रवासी, विक्रेता, सामान्य कामगार, तारतंत्री, तार आत घालणारा (आकार-कातरी) दाब देणारा, भरण आणि आवेष्टन करणाऱ्या महिला. | प्रतिदिन रु. ५.०० दरमहा रु. ४०० रु. ४२५ (टंकलेखक) | प्रतिदिन रु. १९.९५ |
| अकुशल.—साफसफाई, जोडणीकाम, सफाईगार, मदतनीस, पहारेकरी, बफर सहायक, आवेष्टक, हातकामगार म्हणजे स्क्रू वसवणे, कटाई, पहारेकरी, साचेकाम इत्यादी. | प्रतिदिन रु. ४.३७ दरमहा रु. २५० | प्रतिदिन रु. १५.०० |

## जोडपत्र 'छ'

### दि बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टिकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने केलेले अभिवेदन
### मुंबई व्यापारेतर महामंडळ अधिनियम, १९५९ खाली नोंदणीकृत
### (नोंदणी क्रमांक १९६६ चा एनटीसी-३९)

---

नॅशनल इंडस्ट्रिज
कस्तुरबा रोड, मालाड,
मुंबई—४०० ०६४.
दिनांक २३ ऑगस्ट १९७५.

नोंदणीकृत पोच देय डाकेने

माननीय उद्योग व कामगार मंत्री,
महाराष्ट्र शासन,
सचिवालय,
मुंबई-३२.

**विषय.**—किमान वेतन अधिनियम—प्लॉस्टिकचा उद्योग—चष्म्याच्या फ्रेम्सच्या उद्योगाला लागू करणे—सूट मिळावी म्हणून विनंती.

महोदय,

किमान वेतन अधिनियमाच्या तरतुदींन्वये प्लॉस्टिक मालाच्या उद्योगाशी संबंधित उद्योगांचे किमान वेतन दर निश्चित करण्यासाठी शासनाने एक समिती नियुक्त केल्याचे समजते. केवळ या उद्योगासाठी वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालास प्लॉस्टिक माल मानून त्याच्या आधारे चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याचा व्यवसाय या प्लॉस्टिक माल उद्योगाखाली जोडण्यात येऊ नये व परिस्थितीचे अचूक दर्शन घडवावे या हेतूने आम्ही खालील निवेदन सादर करीत आहोत :

१. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्याच्या उद्योगात बहुतेक अकुशल कामगार काम करतात. कारण, चष्म्याच्या फ्रेम्स बनविण्यामधील सुमारे ४२ कामे ही कसल्याही कौशल्याची गरज नसलेली व त्याच त्या स्वरूपाची अशी "हात-कामे" आहेत. यामध्ये यंत्रांचा वापर अतिशय थोडा असतो. म्हणून, या उद्योगाचे उत्पादन 'यंत्र-निर्मित' न मानता 'हस्त-निर्मित' मानले जावे.

२. कुटीर उद्योगाच्या धर्तीचा हा उद्योग असल्यामुळे तो गुजरात राज्यामध्ये प्रामुख्याने खेड्यांतून प्रस्थापित झालेला आहे.

३. चष्म्याच्या फ्रेम्स तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या आधारे, जरी हा उद्योग प्लॅस्टिक वस्तूंच्या उद्योगाच्या वर्गीकरणात मोडत असला, तरी त्याच्या कामाचे आणि कामगारांचे स्वरूप प्लॅस्टिक वस्तूंच्या उद्योगाहून अतिशय भिन्न आहे.

४. [redacted] वस्तूचे उत्पादन आणि उत्तम व्यवस्थापन व बाजारपेठ यांच्याद्वारे अनुकूल परिस्थिती राखण्यास आम्ही समर्थ असलो तरी, केवळ महाराष्ट्र राज्यात प्लॅस्टिक वस्तूंच्या उद्योगाच्या आधारे किमान वेतन अधिनियमानुसार वेतनाचे दर जर आमच्या उद्योगाच्या बाबतीत लागू केले, तर गुजरात, दिल्ली इत्यादी राज्यांनी तसे केलेले नसल्यामुळे महाराष्ट्रातील कारखान्यांमधील चढाओढीवर आणि विशेषेकरून बृहन्मुंबईतील कारखान्यांमधील चढाओढीवर अत्यंत दुष्परिणाम होतील.

५. महाराष्ट्र राज्यात फार वर्षापासून प्रस्तापित झालेला व इतर राज्यांतील उत्पादकांचे नेतृत्व करणारा हा उद्योग, किमान वेतन अधिनियमाखाली अतिरिक्त वेतनांच्या स्वरूपातील ज्यादा ओझे लादून धोक्यात आणू नये, अशी आम्ही विनंती करतो.

समितिला अचूक वस्तुस्थितीच्या आधारे निर्णय घेणे शक्य व्हावे व अनेक छोट्या छोट्या उद्योजकाना ज्यातील काही स्वतःच मालक व कामगार म्हणून कामे बजावतात अशांना न्याय देता यावा म्हणून आवश्यक असल्यास, आम्ही याबाबतीत आणखी स्पष्टीकरणात्मक माहिती देव.

आपल्याकडून अनुकूल आदेश मिळतील अशी आशा आहे.

धन्यवाद !

आपला,

ए. सी. शेठ,

अध्यक्ष,

बॉम्बे स्मॉल-स्केल ऑप्टिकल फ्रेम्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, मुंबई.

प्रत माहितीसाठी—

(१) कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई.

(२) सचिव, प्लॉस्टिक वस्तूंच्या उद्योगासाठी किमान वेतन अधिनियम, समिती, महाराष्ट्र शासन, कामगार मंत्रालय, सचिवालय, मुंबई.

शामुना—ए-१—अआश्रमु—२-८४—४१५—पीए-५*